दैनिक
www.epaper.rajyaloktantra.com
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक
बीड - महाराष्ट्र | वर्ष-६ | अंक-१४३ | बुधवार दि.१२ ऑगस्ट २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने-६ | किंमत ३ रूपये

## थोडक्यात...

### मुख्यमंत्र्यांच्या वर्षावर साप-विंचू सोडा-राऊत

मुंबई : गडचिरोली जिल्ह्यात सोमवारी (१० ऑगस्ट) सर्पदंशामुळे तीन आदिवासी विद्यार्थिनींचा मृत्यू झाला. यावरून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी तीव्र संताप व्यक्त केला. 'आदिवासी बांधवांनी आता जंगलातले साप आणि विंचू पकडून या मंत्र्यांच्या घरात तसेच मुख्यमंत्र्यांच्या वर्षा बंगल्यावर सोडावे. तेव्हाच, यांना मृत्यूचे भय काय असते ते समजेल.' असे म्हणत त्यांनी थेट हल्लाबोल केला. शासकीय आश्रमशाळांची अवस्था अतिशय भयंकर आहे. मुलींना झोपायला साधे बेड नाहीत, त्यामुळे त्या खाली झोपल्या आणि त्यांना सर्पदंश झाला. या राज्याचे आदिवासी विकास मंत्री आणि मुख्यमंत्री काय करत आहेत? आदिवासींच्या विकासासाठी आलेला निधी नेमका कुठे जातो? आणि कोण खातो? आठवड्यातून दोन-तीन वेळा अशा घटना घडत आहेत. पण, त्या रेकॉर्डवर येऊ दिल्या जात नाहीत. असे म्हणत खासदार राऊत यांनी गंभीर आरोप केले.

### महाराष्ट्राला 'इनोव्हेशन हब' बनविण्यासाठी युवांना संधी

मुंबई: महाराष्ट्राला 'इनोव्हेशन हब' म्हणून विकसित करण्याच्या उद्देशाने प्रशासनासमोरील आव्हानांवर नाविन्यपूर्ण उपाय सुचविण्यासाठी युवा प्रतिभांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात येणार आहे. 'द गव्हर्नन्स चॅलेंज टीजीसी २०२६'च्या चौथ्या पर्वाची राज्य शासनाने घोषणा केली असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. मुख्यमंत्री म्हणाले की, भारतातील राज्य शासन व्यवस्थेवर केंद्रित पहिली राष्ट्रीय प्रशासन केंद्रीत केस स्पर्धा म्हणून आयोजित करण्यात येणाऱ्या या उपक्रमाच्या माध्यमातून देशातील प्रतिभावान युवा विद्यार्थ्यांना महाराष्ट्राच्या नवोन्मेषाच्या भविष्यासाठी नाविन्यपूर्ण उपाय सुचविण्याची संधी मिळणार आहे. राज्य शासनाच्या पुढाकाराने, गेट्स फाउंडेशनच्या सहकार्याने आणि समग्र संस्थेच्या आयोजनातून ही स्पर्धा होणार आहे. देशातील ३० नामांकित बिझनेस आणि पब्लिक पॉलिसी संस्थांमधील विद्यार्थी यामध्ये सहभागी होणार आहेत.

### अंतराळ क्षेत्रात भारताची नवी भरारी

बंगळूरु: चंद्रावरील मानवाचे पहिले कायमस्वरूपी तळ (आउटपोस्ट) म्हणून संकल्पित असलेल्या नासाच्या महत्त्वाकांक्षी मून बेस कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी अमेरिकेने भारताला निमंत्रित केले आहे. बंगळूरु येथील इस्रोच्या मुख्यालयात झालेल्या भारत-अमेरिका स्पेस जॉइंट वर्किंग ग्रुपच्या नवव्या बैठकीदरम्यान हे निमंत्रण देण्यात आले होते; मात्र याचे तपशील आता समोर आले आहेत. भारत-अमेरिका अंतराळ सहकार्याचा हा एक नवीन आणि महत्त्वपूर्ण अध्याय ठरू शकतो. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या राष्ट्रीय अंतराळ धोरणाची उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी नासाने २४ मार्च २०२६ रोजी आयोजित केलेल्या इग्निशन कार्यक्रमादरम्यान मून बेस प्रकल्पाची घोषणा केली होती. नुकतीच बंगळुरू येथील इस्रोच्या मुख्यालयात भारत-अमेरिका नागरी अंतराळ संयुक्त कार्यगटाची ९ वी बैठक पार पडली. या बैठकीदरम्यान नासाने इस्रोला हे निमंत्रण दिले. चंद्राचा शांततापूर्ण व शाश्वत शोध घेण्याच्या ध्येयाने झालेल्या आर्टेमिस कराराच्या धर्तीवर हे निमंत्रण देण्यात आले आहे.

### बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१० ऑगस्ट २०२६**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: १३१.५० क्विंटल | २,५०० | २,९२१ | २,६५४ |
| ज्वारी/हायब्रिड: ११६.०० क्विंटल | २,४१० | ४,८७६ | २,८९६ |
| मका/लोकल: १०.०० क्विंटल | २,४३५ | २,४३५ | २,४३५ |
| तूर : २.०० क्विंटल | ६,५०१ | ६,५०१ | ६,५०१ |
| उडीद : २.०० क्विंटल | ५,००० | ५,००० | ५,००० |
| बाजरी: १०२.५० क्विंटल | २,३०० | २,९०१ | २,५८५ |
| मुग: ४१.५० क्विंटल | ५,८०० | ५,८१२ | ५,८०६ |
| सोयाबीन: १०.०० क्विंटल | ६,८०० | ६,८०० | ६,८०० |
| हरभरा: २.५० क्विंटल | ५,००० | ५,९६१ | ५,४८० |

# पीक विम्याच्या आकडेवारीत मोठी तफावत

## सरकारी दावे संशयाच्या भोवऱ्यात, अधिकृत डॅशबोर्डवर ३८.१२ लाख शेतकरी, तर शासनाचा दावा ६१.८२ लाखांचा

मुंबई । प्रतिनिधी

**राज्यातील खरीप पीक विमा योजनेच्या आकडेवारीवरून सरकारी यंत्रणेच्या दाव्यांमध्ये आणि केंद्र सरकारच्या पंतप्रधान पीक विमा योजनेच्या अधिकृत डॅशबोर्डवरील आकडेवारीमध्ये मोठी तफावत असल्याचे समोर आले आहे. मुदतवाढीनंतर राज्यात ६१ लाख ८२ हजार २१८ शेतकऱ्यांनी पीक विमा काढल्याचा दावा राज्य सरकारकडून करण्यात आला आहे. मात्र, केंद्राच्या अधिकृत डॅशबोर्डवरील १० ऑगस्टच्या आकडेवारीनुसार राज्यात प्रत्यक्ष ३८ लाख १२ हजार ९२० शेतकरी पीक विमा योजनेत सहभागी झाल्याचे दिसून येते. यामुळे पीक विमा योजनेतील 'अर्जांची संख्या' आणि 'विमा काढलेल्या शेतकऱ्यांची संख्या' यामध्ये गल्लत होत आहे का, असा प्रश्न उपस्थित झाला आहे.**



चालू खरीप हंगामात ९ ऑगस्टपर्यंत राज्यातील ३८ लाख १२ हजार ९२० शेतकऱ्यांच्या ७५ लाख २३ हजार ३५४ अर्जांना मंजुरी देण्यात आली आहे. यामध्ये पीक कर्ज घेतलेल्या शेतकऱ्यांचे ४ लाख ५ हजार २५५ अर्ज, तर पीक कर्ज न घेतलेल्या शेतकऱ्यांचे तब्बल ७१ लाख १८ हजार ९९ अर्ज आहेत. एका शेतकऱ्याने वेगवेगळ्या पिकांसाठी किंवा वेगवेगळ्या क्षेत्रासाठी एकापेक्षा अधिक अर्ज केलेले असू शकतात. त्यामुळे ७५ लाख अर्ज म्हणजे ७५ लाख शेतकरी, असा अर्थ काढता येत नाही. अधिकृत डॅशबोर्डवरही अर्ज आणि शेतकरी यांची संख्या स्वतंत्रपणे नमूद करण्यात आली आहे.२०२५ च्या खरीप हंगामात राज्यात ४५ लाख ३४ हजार ५५० शेतकऱ्यांनी पीक विमा काढला होता. यंदा ही संख्या ३८ लाख १२ हजार ९२० वर आली आहे. म्हणजेच मागील वर्षाच्या तुलनेत यंदा सुमारे ७ लाख २१ हजार ६३० शेतकरी कमी झाले असून, ही घट १५.९१ टक्के आहे.मागील वर्षी ९२ लाख ९५ हजार २५४ अर्जांद्वारे ५९ लाख १३ हजार ३४ हेक्टर क्षेत्रातील पिकांचा विमा उतरविण्यात आला होता. त्यावेळीही सरकारकडून सुमारे ९१ लाख शेतकऱ्यांनी पीक विमा काढल्याचा दावा करण्यात आला होता. मात्र, उपलब्ध आकडेवारीत अर्ज आणि प्रत्यक्ष विमाधारक शेतकरी यामध्ये मोठी तफावत असल्याचे ▶▶ पान २ वर

### पारदर्शक आकडेवारी जाहीर करण्याची गरज...

एकीकडे राज्य सरकारकडून ६१.८२ लाख शेतकऱ्यांनी पीक विमा काढल्याचा दावा केला जात असताना, केंद्राच्या अधिकृत डॅशबोर्डवर ३८.१२ लाख शेतकरी दिसत असल्याने ही तफावत स्पष्ट करण्याची जबाबदारी शासनाची आहे. अर्जांची संख्या आणि प्रत्यक्ष विमाधारक शेतकऱ्यांची संख्या स्वतंत्रपणे जाहीर करून शासनाने पारदर्शक आकडेवारी उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी आता पुढे येत आहे.पीक विमा योजनेची व्याप्ती वाढल्याचा दावा करण्यापेक्षा प्रत्यक्ष किती शेतकरी योजनेत सहभागी झाले, किती क्षेत्र विम्याखाली आले आणि नुकसान झाल्यानंतर किती भरपाई मिळाली, याची स्पष्ट माहिती उपलब्ध होणे शेतकऱ्यांच्या दृष्टीने अधिक महत्त्वाचे ठरणार आहे.

# शरद पवारांच्या नातीच्या रिसेप्शनला मोदींपासून गांधींपर्यंत हजेरी



नवी दिल्ली । वृत्तसंस्था

**दिल्लीत पार पडलेल्या रेवती सुळे आणि सारंग लखाणी यांच्या रिसेप्शनची सध्या राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा आहे. एका बाजूला देशातील दिग्गज राजकीय नेत्यांनी या सोहळ्याला उपस्थिती लावली, तर दुसरीकडे पवार कुटुंबातील एका महत्त्वाच्या सदस्याच्या गैरहजेरीने चर्चांना उधाण आलं आहे. या रिसेप्शनला पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, सोनिया गांधी, राहुल गांधी, प्रियंका गांधी यांच्यासह अनेक बड्या नेत्यांनी उपस्थित राहून नवदाम्पत्याला शुभेच्छा दिल्या.**

खासदार सुप्रिया सुळे यांच्या कन्या रेवती सुळे आणि सारंग लखाणी यांच्या रिसेप्शनसाठी दिल्लीतील राजकीय वर्तुळातील अनेक दिग्गज एकाच छताखाली आले होते. या सोहळ्यातील फोटो आणि व्हिडीओ सोशल मीडियावर समोर आल्यानंतर राजकीय नेत्यांच्या भेटीगाठींचीही चर्चा ▶▶ पान २ वर

# मुंबईत धडकणार मराठ्यांचे वादळ

## मनोज जरांगे यांची पुन्हा एकदा घोषणा

सांगली । प्रतिनिधी


**मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी आंदोलनात पुन्हा प्राण फुंकला आहे.मराठ्यांचे भगवे वादळ लवकरच मुंबईत धडकण्याची शक्यता आहे. जरागेंनी सरकारला धडकी भरवणारी घोषणा सांगली जिल्ह्यातून केली आहे. यापूर्वी एकदा वाशीच्या वेशीवर आणि नंतर आझाद मैदानात आंदोलन झाले होते.**



पश्चिम महाराष्ट्रातल्या कार्यकर्त्यांसह राज्यातले मराठी बांधव आता आंतरवाली सराटीला येऊन मुंबईकडे रवाना होतील का काय अशी परिस्थिती सध्या निर्माण झाली आहे, असे मोठे वक्तव्य मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी केले. २९ ऑगस्ट रोजीचे आंदोलन हे मुंबईला होतंय की? काय अशी परिस्थिती सध्या निर्माण झाल्याची भावना संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांनी व्यक्त केली आहे.जी चूक केली त्याबद्दल बोला, लोकांचा रोष कमी होईल. कुणबी प्रमाणपत्र द्या. सरकारने मराठा समाजाला प्रचंड हिणवले आहे. ३ वर्षात किती मोर्चे झाले आणि या काळात काय दिले असा सवाल त्यांनी केला. मराठा समाजाचा पुन्हा मुंबईला जाण्याचा देखील विचार आहे. मला अनेक मराठा नेत्याच्या फोन येतो, आमदार,खासदार फोन करून तुम्ही म्हणताय ते पटते असे सांगतात, राणेंसारखे अनेक मराठा नेते आता बोलू लागले आहेत, ▶▶ पान २ वर

# कोकण, घाटमाथ्यावर पावसाचा ऑरेंज अलर्ट

## उर्वरित राज्यात मात्र उघडीप



पुणे । प्रतिनिधी

राज्यात बहुतांश भागात पावसाने उघडीप दिली असून कोकण आणि घाटमाथ्यावर तुरळक ठिकाणी पावसाच्या हलक्या ते मध्यम सरी हजेरी लावत आहेत. तर राज्याच्या उर्वरित भागात तुरळक ठिकाणी ढगाळ हवामानासह ऊन-सावल्यांच्या खेळात हलक्या सरी हजेरी लावत आहेत. मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यासह विदर्भात पावसाने उघडीप दिल्याने पिकं तहानलेली आहेत. त्यामुळे शेतकरी पावसाची प्रतीक्षा करत आहेत. बुधवारी पुणे घाटमाथ्यावर जोरदार पावसाचा ऑरेंज ▶▶ पान २ वर

# अभिजीत दीपकेने केली नव्या आंदोलनाची घोषणा

## १५ ऑगस्टपासून देशव्यापी मोहीम सुरू करणार

पुणे । प्रतिनिधी

गावागावातील सरकारी शाळांची दुरवस्था आणि ग्रामीण भागातील शैक्षणिक सुविधांकडे होणारे दुर्लक्ष याविरोधात कॉकरोच जनता पार्टीने देशव्यापी अभियान सुरू करण्याची घोषणा केली आहे. पक्षाचे संस्थापक अभिजीत दिपके यांनी येत्या १५ ऑगस्टपासून या अभियानाला सुरुवात केली जाणार असल्याचे सांगितले. ग्रामीण भागातील सरकारी शाळांमध्ये मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासोबतच नागरिक, पालक आणि



स्थानिक लोकप्रतिनिधींनी या प्रक्रियेत सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

अभिजीत दिपके यांनी व्हिडीओद्वारे या अभियानाची माहिती दिली. महाराष्ट्रातील हिंगोली जिल्ह्यातील त्यांच्या गावापासून या उपक्रमाची सुरुवात करण्यात येणार असून, गावातील सरकारी शाळांची सद्यस्थिती सुधारण्यासाठी ते स्वतः सरपंचांशी संपर्क साधणार असल्याचे त्यांनी सांगितले. त्यानंतर देशभरातील इतर गावांमध्येही या उपक्रमाचा विस्तार करण्याचे चे नियोजन आहे. १५ ऑगस्ट हा भारताचा ८० वा स्वातंत्र्यदिन आहे. स्वातंत्र्याच्या आठ दशकांनंतरही ग्रामीण ▶▶ पान २ वर

# राष्ट्रपतीच्या हस्ते येवला पैठणी टपाल तिकीट प्रकाशित



नवी मुंबई । प्रतिनिधी

महाराष्ट्राच्या समृद्ध कला, संस्कृती आणि परंपरेची जगभर ओळख निर्माण करणा-या नासिक जिल्ह्यातील येवला पैठणीच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. नवी दिल्लीतील राष्ट्रपती भवन सांस्कृतिक केंद्रात आयोजित १२ व्या राष्ट्रीय हातमाग दिनाच्या कार्यक्रमात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते येवला पैठणीच्या स्मरणार्थ विशेष टपाल तिकीट प्रकाशित करण्यात आले.

येवला पैठणी ही केवळ साडी ( पैठणी ) नसून महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वैभवाचे प्रतीक मानली जाते. हातमागावर ▶▶ पान २ वर

# पिकनिकला गेलेल्या मावळच्या ४ मित्रांचा अपघाती मृत्यू, दोघे गंभीर



पुणे । प्रतिनिधी

**महाबळेश्वरला पिकनिकसाठी निघालेल्या सहा मित्रांच्या आनंदावर काळाने घाला घातला. पुणे-सातारा महामार्गावरील शिरवळ परिसरात भरधाव कारचा भीषण अपघात झाला. चालकाचा ताबा सुटल्याने कार डिव्हायडर ओलांडून विरुद्ध दिशेने येणाऱ्या आयशर ट्रकला धडकली. धडक इतकी भीषण होती की कारचा अक्षरशः चक्काचूर झाला. या दुर्घटनेत मावळ आणि तळेगाव परिसरातील चार तरुणांचा जागीच मृत्यू झाला, तर दोघे गंभीर जखमी झाले आहेत.**

या अपघातात वेदांत अर्जुन वारिंगे (१९), सोनलिंग धीरेंद्र ठाकूर (१९), आदित्य बाळासाहेब गरुड (१९) आणि निखिल बाळू राऊत (२०) यांचा मृत्यू झाला. तर दीक्षित दयानंद पुजारी (२०) आणि मयूर हनुमंत शिंदे (२०) हे दोघे गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. माहितीनुसार, सहाही मित्र टाटा नेक्सॉन कारमधून पुण्याहून साताऱ्याच्या दिशेने महाबळेश्वरकडे निघाले होते. शिरवळ परिसरात कार आली असता चालकाचा वाहनावरील ताबा सुटला. कार आधी डिव्हायडरला ▶▶ पान २ वर

# आमदारांची फूट म्हणजे पक्षाची फूट नव्हे

## शिवसेना चिन्ह प्रकरणात कपिल सिब्बल यांचा निवडणूक आयोगावर जोरदार हल्लाबोल




नवी दिल्ली । वृत्तसंस्था

शिवसेना पक्ष आणि धनुष्यबाण चिन्हाबाबत निवडणूक आयोगाने दिलेल्या निर्णयाला आव्हान देणाऱ्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरू असून, मंगळवारी ज्येष्ठ वकील कपिल सिब्बल यांनी निवडणूक आयोगाच्या आदेशातील कायदेशीर त्रुटींवर जोरदार बोट ठेवले. निवडणूक आयोगाने निवडणूक चिन्ह आदेशातील परिच्छेद १५ अंतर्गत घेतलेला निर्णय हा अधिकारक्षेत्राबाहेरचा आणि कायद्याच्या मूलभूत तत्त्वांना छेद देणारा असल्याचा दावा सिब्बल यांनी केला.

### परिच्छेद १५ चा अधिकार चुकीच्या पद्धतीने

निवडणूक आयोगाने चिन्ह आदेशातील परिच्छेद १५ चा वापर करताना आपल्या अधिकारक्षेत्राचा चुकीचा विस्तार केला. त्यामुळे आयोगाचा आदेश कायद्याच्या चौकटीबाहेरचा असून तो रद्दबातल करण्यास पात्र आहे, असा ठाम युक्तिवाद कपिल सिब्बल यांनी सर्वोच्च न्यायालयात केला. शिवसेना पक्ष आणि धनुष्यबाण चिन्हाबाबतचा हा वाद आता सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाकडे लागला असून, आजच्या सुनावणीत सिब्बल यांनी मांडलेल्या मुद्द्यांमुळे निवडणूक आयोगाच्या निर्णयातील कायदेशीर आधारावरच मोठे प्रश्न उपस्थित झाले आहेत.

सिब्बल यांनी आपल्या युक्तिवादात निवडणूक आयोगाच्या निर्णयाचे चार प्रमुख टप्पे मांडले. त्यामध्ये शिवसेनेत फूट पडल्याचा निष्कर्ष, पक्षाची घटना विवाद सोडवण्यासाठी अयोग्य ठरवणे, संघटनेतील बहुमताऐवजी विधिमंडळ पक्षातील बहुमताला प्राधान्य देणे आणि त्याच बहुमताच्या आधारे पक्षाचे चिन्ह शिंदे गटाला देणे, या मुद्द्यांचा समावेश होता. 'आमदारांचा स्वतंत्र गट म्हणजे मूळ ▶▶ पान २ वर

## अग्रलेख

# मुली घर सोडतात की आपण त्यांना घर सोडायला भाग पाडतो?

मुलगी घरातून निघून गेली की आपल्या समाजाकडे उत्तरांची कमतरता नसते. मोबाईलमुळे बिघडली, प्रेमप्रकरण होतं, आजकालच्या मुलींना स्वातंत्र्य जास्त मिळालं, संस्कारच राहिले नाहीत-चार वाक्यांत निकाल, पाचव्या वाक्यात चारित्र्यहनन आणि सहाव्या वाक्यात पालकत्व निर्दोष! इतकी सोपी आपली सामाजिक न्यायव्यवस्था आहे. पण एक प्रश्न मात्र कुणी विचारत नाही-मुलगी घर सोडण्याचा निर्णय घेण्यापूर्वी घरात तिचं ऐकून घेणारं कोण होतं?

नाशिक शहरातील पोलिसांच्या आकडेवारीचा हवाला देत समोर आलेली माहिती या ढोंगी आत्मसमाधानाला चपराक मारणारी आहे. २०२५ मध्ये नाशिक शहरातून ३५४ मुलं-मुली बेपत्ता झाल्याची नोंद झाली आणि त्यापैकी तब्बल २७६ मुली होत्या. म्हणजे जवळपास ७८ टक्के! मुलांच्या तुलनेत मुलींचं घर सोडण्याचं प्रमाण जवळपास चारपट असल्याचं वृत्तात नमूद करण्यात आलं आहे. आता हा आकडा पाहून आपण नेहमीचा कार्यक्रम करू शकतो-दोन दिवस चिंता व्यक्त करायची, सोशल मीडियावर 'मुलींना संस्कार द्या'चे संदेश फिरवायचे आणि तिसऱ्या दिवशी सगळं विसरायचं. कारण समस्या मुलींची आहे, आपली नाही, असं मानून मोकळं होणं ही आपल्या समाजाची जुनी सवय आहे. पण या २७६ मुली म्हणजे २७६ आकडे नाहीत. त्या २७६ घरांच्या कहाण्या आहेत. कुठे संवाद संपला असेल, कुठे सततच्या भांडणांनी मुलीला घर असुरक्षित वाटलं असेल, कुठे शिक्षण आणि करिअरच्या नावाखाली तिच्या इच्छांवर बुलडोझर चालवला असेल, कुठे प्रेमसंबंध लपवावा लागला असेल आणि कुठे सोशल मीडियावर भेटलेल्या व्यक्तीत तिला घरापेक्षा अधिक विश्वास वाटला असेल. पण आपण मूळ प्रश्नाकडे जाणार नाही. कारण तो प्रश्न विचारला तर पालकत्वाची परीक्षा घ्यावी लागेल. त्यापेक्षा मोबाईलला दोष देणं फार सोयीचं! आपण मुलीला मोबाईल देतो, इंटरनेट देतो, सोशल मीडिया देतो; पण विश्वास देतो का? तिच्या शिक्षणाबद्दल विचारतो, पण तिच्या भीतीबद्दल विचारतो का? तिच्या गुणांची चौकशी करतो, पण तिच्या मनाची चौकशी करतो का? तिचे मित्र कोण, तिचं भवितव्य काय, तिचं लग्न कुठे करायचं-सगळ्याचे निर्णय घ्यायचे; पण तुला खरंच काय हवं आहे? हा एक साधा प्रश्न विचारायला मात्र वेळ नाही. मग एखाद्या दिवशी ती घरातून निघून गेल्यावर आपण संस्कारांची वही उघडतो. किती विलक्षण पालकत्व! प्रेमसंबंध असतील तर दोष मुलीचा. सोशल मीडियावर कुणाशी बोलत असेल तर दोष मुलीचा. स्वतःच्या आयुष्याबद्दल निर्णय घेत असेल तर दोष मुलीचा. घरातील वातावरणामुळे त्रास होत असेल तरी दोष मुलीचाच. म्हणजे मुलगी काहीही करेल, अंतिम दोषी तीच! मग घरातील पुरुषसत्ताक नियंत्रण, पालकांची दडपशाही, भावनिक ब्लॅकमेलिंग, सततची तुलना, गुणांचं ओझं आणि 'लोक काय म्हणतील?' या राष्ट्रीय रोगाचा हिशेब कोण देणार? मुलीला सुरक्षित ठेवायचं म्हणून तिच्यावर निर्बंध घालायचे. कुठे जायचं, कोणाशी बोलायचं, काय घालायचं, किती वाजता घरी यायचं-सगळ्यावर नियम. आणि त्याला आपण मोठ्या अभिमानाने काळजी म्हणतो. खरं तर काळजी आणि नियंत्रण यांच्यात फरक असतो. काळजीत विश्वास असतो; नियंत्रणात संशय. काळजी मुलाला मजबूत करते; नियंत्रण मुलाला खोटं बोलायला शिकवतं. आणि जेव्हा घरात प्रत्येक प्रश्नाला आम्ही तुझ्या भल्यासाठीच सांगतोय हे उत्तर मिळतं, तेव्हा मुलं शेवटी स्वतःच्या भल्याचा निर्णय स्वतः घेण्यासाठी घराबाहेर पडतात. मोबाईल निश्चितच धोका निर्माण करू शकतो. सोशल मीडियावर अनोळखी व्यक्तींशी संपर्क, खोटी ओळख, भावनिक फसवणूक, खासगी माहितीचा गैरवापर किंवा प्रत्यक्ष भेटीसाठी दबाव-हे गंभीर धोके आहेत. पण मोबाईलवर बंदी घालून प्रश्न सुटणार असेल तर जगातील पालकत्वाची सर्वात मोठी समस्या चार्जर काढून सोडवता आली असती! प्रश्न मोबाईलचा नाही; प्रश्न डिजिटल जग समजून घेण्याचा आहे. मुलांना धोके समजावून सांगण्याऐवजी त्यांचा फोन हिसकावून घेणं म्हणजे पोहायला शिकवण्याऐवजी समुद्रावर बंदी घालण्यासारखं आहे. आणखी एक कटू सत्य म्हणजे-मुलगी बेपत्ता झाली की समाजाला तिच्या सुरक्षिततेपेक्षा तिच्या चारित्र्याची चिंता अधिक असते. ती कुठे आहे? सुरक्षित आहे का? कोणाच्या संपर्कात आहे? तिला धोका आहे का? हे प्रश्न नंतर. आधी प्रश्न-कोणाबरोबर गेली? आणि मग लगेच सामाजिक न्यायालयाचा निकाल-नक्की प्रेमप्रकरण असणार! मुलगी सापडण्यापूर्वीच तिचं चरित्र सापडतं. हा समाज किती संवेदनशील आहे, याची हीच खरी ओळख. मुलगी सापडल्यानंतरही आपलं काम संपत नाही. उलट तिथून खरी परीक्षा सुरू होते. तिला पुन्हा दोष देणार की तिचं म्हणणं ऐकणार? आमची बदनामी केलीस असं म्हणणार की तुला इतकं असुरक्षित का वाटलं? असं विचारणार? कारण मुलगी घरात परत आली म्हणून ती मानसिकदृष्ट्या घरी परतलीच असेल असं नाही. तिच्या मनातला दरवाजा बंद असेल तर घराच्या दरवाजाला कुलूप लावून काय उपयोग? शाळा-महाविद्यालयांची स्थितीही वेगळी नाही. विद्यार्थ्यांना गुण, परीक्षा, स्पर्धा परीक्षा आणि करिअर यासाठी प्रशिक्षण मिळतं; पण भावनिक संकट आलं तर कुणाकडे जावं, ऑनलाइन फसवणूक कशी ओळखावी, नात्यांमध्ये दबाव कसा ओळखावा आणि मानसिक ताणाबद्दल कुणाशी बोलावं-याचं शिक्षण कुठे आहे? शिक्षणव्यवस्थेला मार्कशीटची काळजी आहे; विद्यार्थ्यांच्या मानसिक स्थितीची नाही, असा संदेश जाऊ नये. पोलिसांची जबाबदारी तर आहेच. बेपत्ता मुलीच्या प्रकरणात सुरुवातीचा वेळ अत्यंत महत्त्वाचा असतो. तक्रारीची तातडीने नोंद, डिजिटल पुराव्यांचा तपास, मोबाईल लोकेशन, संबंधित व्यक्तींची चौकशी आणि कुटुंबाला योग्य मार्गदर्शन या सगळ्याची गरज आहे. पण प्रत्येक मुलगी घर सोडण्यापूर्वी पोलिस स्टेशनपर्यंत पोहोचेलच असं नाही. म्हणून कायदा शेवटची सुरक्षा आहे; पहिली सुरक्षा घर असायला हवं. आणि म्हणूनच आज प्रश्न मुलींना शिकवण्याचा नाही; पालकांना शिकवण्याचा आहे. मुलींचं रक्षण करण्याच्या नावाखाली त्यांना कैद करण्याची मानसिकता सोडावी लागेल. मुलींच्या स्वातंत्र्याला संशयाच्या नजरेने पाहणं थांबवावं लागेल. घरात संवाद हवा, पण चौकशीच्या स्वरूपात नाही. नियम हवेत, पण अपमानाच्या स्वरूपात नाहीत. शिस्त हवी, पण भीतीच्या आधारावर नाही. आणि सर्वांत महत्त्वाचं-मुलीला स्वतःचं आयुष्य जगण्याचा अधिकार आहे, हे पालकांनी 'उपकार' म्हणून नव्हे तर मूलभूत सत्य म्हणून स्वीकारलं पाहिजे.कारण शेवटी प्रश्न असा नाही की मुली घरातून का पळतात? प्रश्न अधिक अस्वस्थ करणारा आहे- त्या घरात असताना आपण त्यांना इतकं ऐकून घेतो का की त्यांना घर सोडून आपलं म्हणणं ऐकून घेणारा कुणीतरी दुसरा शोधण्याची गरज पडू नये? २७६ मुलींचा आकडा आपल्याला हाच प्रश्न विचारतोय. पण आपण पुन्हा मोबाईलला दोष देऊ शकतो. प्रेमाला दोष देऊ शकतो. सोशल मीडियाला दोष देऊ शकतो. संस्कारांची भाषणं देऊ शकतो. फक्त एक गोष्ट टाळू शकतो-आरशात स्वतःकडे पाहणं. आणि कदाचित याच कारणामुळे मुलींच्या बेपत्ता होण्याची बातमी दरवर्षी नवी असते; पण आपली कारणं मात्र वर्षानुवर्षे तीच असतात.

# मानवाप्रमाणेच प्राण्यांच्या जीवाचंही तेच मोल, अशी क्रूरता अक्षम्य आहे ; आरोपीवर तातडीने कारवाई करा

## अंबरनाथमधील 'त्या' घटनेची ना. पंकजाताई मुंडेंनी घेतली दखल ; ठाण्याच्या एसपींना केली सूचना

मुंबई । प्रतिनिधी

**अंबरनाथच्या रॉयल फ्लोरा फेज-२ मध्ये २६ जुलैला बाराव्या मजल्यावरून मांजरीला खाली ढकलून ठार केल्याचा व्हिडिओ सोशल मिडियावर व्हायरल झाल्यानंतर या घटनेवर राज्याच्या पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांनी ठाणे जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक यांना पत्र पाठवून संबंधित व्यक्तीवर तात्काळ कारवाईसाठी पत्र पाठवले आहे.**

'प्राण्यांच्या जीवाचे मोल जपणे हे आपले कर्तव्यच आहे, मी स्वतः यात लक्ष घातले आहे, अशी क्रूरता अक्ष्यम आहे' अशा शब्दांत त्यांनी या घटनेवर संताप व्यक्त केला आहे. पोलीस अधीक्षकांना पाठवलेल्या पत्रात पंकजाताई मुंडे यांनी त्या घटनेचा उल्लेख करत नमूद केले आहे, की मांजराच्या लहान पिल्लाला इमारतीवरून एका व्यक्तीने खाली फेकल्यामुळे मृत्यू झाल्याची बदलापूर येथील घटना निदर्शनास आली आहे. या विरोधात स्थानिक प्राणिमित्र संघटनांनी कारवाई होत नसल्याने रोष व्यक्त केल्याचा व्हिडिओ सोशल मीडियात पसरला आहे. यातील आरोपी व्यक्तीची कृती प्राण्यांविरुद्ध क्रूरता करणारी असल्याने प्राणी क्रूरता प्रतिबंधक कायदा १९६० अन्वये दखलपात्र गुन्हा आहे. अशा व्यक्तीविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३, कलम ३२५ नुसार कोणत्याही प्राण्याला मग तो पाळीव असो भटका असो किंवा जंगली असो, ठार मारणे, विष देणे, त्याच्या शरीराचा अवयव तोडून त्याला अपंग करणे किंवा त्याला कायमचे निरुपयोगी करणे प्राण्यांवरील क्रूरता प्रतिबंधक कायदा १९६० पीसीए ॲक्ट १९६०च्या कलम ११ (१) अ नुसार प्राण्यांना शारीरिक इजा पोहोचेल अशाप्रकारे मारहाण करणे गुन्हा आहे.तसेच त्यांच्या क्षमतेपेक्षा जास्त काम करून घेणे किंवा त्यांना विनाकारण वेदना देणे प्राण्यांवरील क्रूरता प्रतिबंधक कायदा १९६० पीसीए ॲक्ट १९६० च्या कलम ११ (१) ल नुसार कोणत्याही प्राण्याला अमानुषपणे अपंग करणे किंवा स्ट्राइकनाईन सारख्या विषारी रसायनांचा वापर करून अथवा विनाकारण क्रूरपणे मारणे या विषयात मी स्वतः लक्ष घालत आहे. मानवाप्रमाणेच प्राण्यांच्या जीवाचं ही तेच मोल आहे, अशी क्रूरता अक्षम्य आहे त्याबाबत त्वरित कार्यवाही करून मला अवगत करावे, असे पंकजाताई मुंडे यांनी आपल्या पत्रात म्हटले आहे. या पत्राची प्रत जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा प्राणीक्लेश प्रतिबंधक समिती ठाणे, जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त तथा सदस्य सचिव जिल्हा आणि प्राणीक्लेश प्रतिबंधक समिती जिल्हा ठाणे यांनाही पाठवण्यात आली आहे.

# बाहेगाव्हण येथे वादळी वाऱ्याने शेतकऱ्याच्या सोलार पॅनलचे नुकसान

वडवणी प्रतिनिधी

वडवणी तालुक्यात काल झालेल्या वादळी वारे मेघगर्जनेसह पावसाने हजेरी लावल्याने शेतकऱ्याच्या खरीप पिका बरोबर बाहेगाव्हण तालुका वडवणी जिल्हा बीड येथील शेतकरी मुंडे आबासाहेब बाबासाहेब यांच्या शेतातील सोलार पॅनलचे नुकसान झाले आहे. ते संबंधित -तख कंपनीने तात्काळ दुरुस्त करून देण्याची मागणी शेतकऱ्यांने केली आहे. सविस्तर वृत्त असे की हवामान खात्याच्या अंदाजानुसार गेली दोन दिवस झाले तालुक्यात वादळी वारे मेघगर्जनेसह पावसाने हजेरी लावली आहे. यामध्ये शेतकऱ्यांच्या शेतातील मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. तर बाहेगाव्हण तालुका वडवणी जिल्हा बीड येथील शेतकरी मुंडे आबासाहेब बाबासाहेब यांच्या बाहेगाव्हण शिवारातील गट नंबर १११ मधील विहीर पाणी सिंचनासाठी आसलेले ५ एच पी चे सोलार पॅनलचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. ते संबंधित कंपनीने तात्काळ भरपाई द्यावी जेणेकरून शेतकऱ्याच्या खरीप पिकाचे नुकसान होणार नाही.



# राज्यस्तरीय अबॅकस स्पर्धेत आष्टीच्या विद्यार्थ्यांचे घवघवीत यश

## मिरहा सय्यद, अधिरा माळवदे, आरव आजबे राज्यात प्रथम; ज्योती पवार यांना 'बेस्ट अबॅकस टीचर' पुरस्कार

आष्टी । प्रतिनिधी

गामा अबॅकस राज्यस्तरीय स्पर्धा २०२६ छत्रपती संभाजीनगर शहरात रविवार दि.९/८/२०२६ रोजी मोठ्या उत्साहात पार पडली राज्यभरातून विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत भाग घेतला होता. या परीक्षेला मोठा प्रतिसाद मिळाला, आष्टी शहरात गेल्या १६ वर्षापासून गामा अबॅकस सेंटर चालवणाऱ्या शिक्षिका ज्योती संजय पवार यांच्या जिनियस गामा अबॅकस केंद्राच्या विद्यार्थ्यांनी ही परीक्षा ५ मिनिटात शंभर गणिते आणि ८ मिनिटात शंभर गणिते सोडविणे अशा या स्पर्धेत खालील विद्यार्थ्यांनी यश संपादन केले.

मिरहा अक्रम सय्यद राज्यात प्रथम क्रमांक (रेनबो लेवल) अधिरा आजीनाथ माळवदे राज्यात प्रथम क्रमांक (बेसीक लेवल) आरव चंद्रकांत आजबे राज्यात प्रथम क्रमांक (४ थी लेवल ) अर्श याशीर सय्यद राज्यात द्वितीय क्रमांक (रेनबो लेवल) श्रीनाथ शिवनाथ टेकाडे राज्यात द्वितीय क्रमांक (१ ली लेवल) अभिजीत नागनाथ पवार राज्यात द्वितीय क्रमांक (६ वी लेवल) विवान पारस मेहेर राज्यात तृतीय क्रमांक (२ री लेवल) शौर्य उत्तम भोपळे राज्यात तृतीय क्रमांक (२ री लेवल) राजवीर अमोल लगड राज्यात तृतीय क्रमांक (३ री लेवल) शिवम राजेंद्र शेळके राज्यात तृतीय क्रमांक (६ वी लेवल) आदित्य चंद्रकांत आजबे राज्यात तृतीय क्रमांक (८ वी लेवल) क्रिशव केशव खोमने राज्यात चौथा क्रमांक (२ री लेवल) सृजन हरिशचंद्र हातवटे राज्यात चौथा क्रमांक (४ थी लेवल) श्रीराज संदीप चौधरी राज्यात चौथा क्रमांक (५ वी लेवल) साईराज उत्तम भोपळे राज्यात चौथा क्रमांक (६ वी लेवल) आर्या योगेश धोंडे राज्यात चौथा क्रमांक (६ वी लेवल) कार्तिक आजीनाथ माळवदे राज्यात चौथा क्रमांक (७ वी लेवल) रोशन शरद खाडे (१ ली लेवल) रोहन अशोक धोंडे (८ वी लेवल) या विद्यार्थ्यांना ट्रॉफी व प्रमाणपत्र तसेच ज्योती संजय पवार यांना बेस्ट अबॅकस टिचर अवार्ड २०२६ देऊन सन्मानित करण्यात आले. कंपनीचे सीईओं डॉ. के. नगुलनाथन (केरळ) उपस्थित मान्यवर, ज्येष्ठ पत्रकार, उद्योजक, यांच्या हस्ते बक्षीस वितरण पार पडले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे जिनीअस गामा अबॅकस क्लासच्या संचालिका ज्योती संजय पवार यांनी अभिनंदन केले.



## पान १ वरून...

### पीक विम्याच्या आकडेवारीत

स्पष्ट होते. यंदा ३८ लाख १२ हजार ९२० विमाधारक शेतकऱ्यांनी ४८ लाख ४६ हजार ८८० हेक्टर क्षेत्रातील विविध पिकांचा विमा उतरविला आहे. या पिकांसाठी एकूण २८ हजार ५३ कोटी ५७ लाख रुपयांची विमा संरक्षित रक्कम निश्चित करण्यात आली आहे. या विम्यासाठी शेतकऱ्यांनी ४८८ कोटी ७३ लाख रुपये विमा हप्ता भरला असून, केंद्र आणि राज्य सरकारचा वाटा प्रत्येकी ५६ कोटी ३७ लाख रुपये आहे. २०२५ च्या खरीप हंगामात एकूण ३१ हजार ७४५ कोटी ४५ लाख रुपये विमा संरक्षित रक्कम होती. त्यापैकी शेतकऱ्यांना नुकसानभरपाईपोटी १ हजार ८७८ कोटी ९३ लाख रुपये क्लेमच्या स्वरूपात देण्यात आले. ही रक्कम एकूण विमा संरक्षित रकमेच्या ५.९२ टक्के इतकी आहे.या हंगामात शेतकऱ्यांनी विमा हप्त्यापोटी ५३७ कोटी ६६ लाख रुपये भरले होते. तर केंद्र आणि राज्य सरकारने प्रत्येकी ९२८ कोटी ४२ लाख रुपये विमा कंपन्यांना दिले होते. पीक विमा योजनेतील नुकसानभरपाईचे मूल्यमापन करताना शेतकरी, केंद्र आणि राज्य सरकारने भरलेल्या विमा हप्त्याची तुलना मिळालेल्या क्लेमच्या रकमेशी केली जाते. मात्र, ही तुलना योग्य नसल्याचे पीक विमा अभ्यासक हेमचंद्र शिंदे यांनी स्पष्ट केले. त्यांच्या मते, शेतकरी, केंद्र आणि राज्य सरकारकडून भरला जाणारा विमा हप्ता हा योजनेतील एक घटक आहे. मात्र, नुकसान झाल्यानंतर शेतकऱ्यांना मिळणाऱ्या भरपाईचे मूल्यमापन करताना एकूण विमा संरक्षित रक्कम आणि प्रत्यक्ष दिलेली नुकसानभरपाई यांची तुलना करणे अधिक योग्य ठरते. शासन, प्रशासन आणि लोकप्रतिनिधींनी केवळ विमा हप्ता आणि क्लेम यांची तुलना करण्यापेक्षा विमा संरक्षित रक्कम, प्रत्यक्ष नुकसान आणि शेतकऱ्यांना मिळालेली नुकसानभरपाई यावर लक्ष केंद्रित करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

------------

### मुंबईत धडकणार

याचे स्वागत आहे. सरकारचा माज उतरवणार असल्याचे ते म्हणाले.पश्चिम महाराष्ट्रात गेल्या तीन दिवसापासून संघर्ष योद्धा मनोज जरांगे यांचा दौरा सुरू आहे. कवठेमंकाळ बोरगाव यासह पश्चिम महाराष्ट्रातील अनेक गावांमध्ये स्वागत व सभा झाल्या आहेत. आज पश्चिम महाराष्ट्र दौराचा समारोप करत असताना सांगली जिल्ह्यातील विटा येथे मनोज जरांगे यांचे भव्य दिव्य पद्धतीने स्वागत होत आहे.

-------------

### शरद पवारांच्या नातीच्या रिसेप्शनला

रंगली आहे.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रिसेप्शनमध्ये तब्बल २० मिनिटे उपस्थिती लावली. यावेळी त्यांनी रेवती आणि सारंग यांची भेट घेऊन त्यांना शुभेच्छा दिल्या. विशेष म्हणजे नरेंद्र मोदी यांनी शरद पवार यांच्यासोबत काही वेळ संवाद साधला. मोदी आणि शरद पवार एकत्र बसून गप्पा मारतानाचे फोटोही समोर आले आहेत.या सोहळ्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासोबत संपूर्ण पवार कुटुंबाने फोटो काढल्याचे पाहायला मिळाले. त्यामुळे या भेटीचे फोटो सोशल मीडियावरही चर्चेचा विषय ठरले आहेत. दरम्यान, पवार कुटुंबातील जवळपास सर्वच सदस्य या रिसेप्शनला उपस्थित होते. मात्र उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची गैरहजेरी विशेष चर्चेत आली. सुनेत्रा पवार या रिसेप्शनला का उपस्थित राहिल्या नाहीत, याचे नेमके कारण अद्याप समोर आलेले नाही.सुनेत्रा पवार गैरहजर असल्या तरी अजित पवार यांचे दोन्ही पुत्र पार्थ पवार आणि जय पवार यांनी रिसेप्शनला आवर्जून हजेरी लावली. त्यामुळे पवार कुटुंबातील या उपस्थितीचीही राजकीय वर्तुळात चर्चा होत आहे.रिसेप्शनमध्ये केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचीही उपस्थिती लक्षवेधी ठरली. अमित शाह यांनी रेवती आणि सारंग यांची भेट घेऊन त्यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी ते शरद पवार आणि सुळे कुटुंबीयांसोबत संवाद साधताना दिसले. विशेष म्हणजे शरद पवार यांच्या शेजारी अमित शाह बसल्याचे दृश्यही कॅमे-यात कैद झाले. याचदरम्यान राहुल गांधीही रिसेप्शनमध्ये उपस्थित होते. राहुल गांधी रिसेप्शनमध्ये असतानाच अमित शाह तेथे पोहोचले. अमित शाह नवदाम्पत्याला शुभेच्छा देण्यासाठी मंचावर गेले, त्यावेळी राहुल गांधी खाली उपस्थित होते. त्यामुळे एकाच सोहळ्यात भाजप आणि काँग्रेसमधील दिग्गज नेते एकत्र आल्याचे पाहायला मिळाले.

-------------

### राष्ट्रपतीच्या हस्ते येवला

अत्यंत कौशल्याने आणि बारकाईने विणली जाणारी पैठणी आपल्या पारंपरिक नक्षीकामासाठी देशभर प्रसिद्ध आहे. मोर, कमळ, आसावली, नारळी आणि मुनीया यांसारख्या पारंपरिक नक्षींमुळे येवला पैठणीला ेगळी ओळख मिळाली आहे. पिढ्यांपिढ्या विणकर आणि कारागिरांनी ही कला जपल्यामुळे आज येवला पैठणी राष्ट्रीय पातळीवर पोहोचली आहे.येवल्याची ओळख देशाच्या वस्त्रोद्योगाच्या नकाशावर अधिक ठळक व्हावी आणि पैठणी उद्योगाला आधुनिक काळानुसार नवी दिशा मिळावी, यासाठी मंत्री छगन भुजबळ सातत्याने प्रयत्नशील आहेत. पैठणी हा येवल्याच्या अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा आधार असून या उद्योगाशी हजारो विणकर, कारागीर, व्यापारी आणि विविध घटक जोडलेले आहेत. त्यामुळे पैठणी उद्योगाचा विकास म्हणजे केवळ एका पारंपरिक कलेचा विकास नसून हजारो कुटुंबांच्या रोजगाराला आणि आर्थिक स्थैर्याला बळ देणे आहे. त्यामुळे या पारंपरिक उद्योगाला आधुनिक बाजारपेठ, पर्यटन आणि तंत्रज्ञानाशी जोडण्यासाठी विविध पातळ्यांवर प्रयत्न सुरू आहेत.

-----------

### अभिजीत दीपकेने केली नव्या

भागातील सरकारी शाळांच्या मूलभूत सुविधांचा प्रश्न कायम असल्याचे दिपके यांनी सांगितले. देशात मोठ्या पायाभूत सुविधा उभारल्या जात असताना गावातील सरकारी शाळांसाठी पुरेशा सुविधा का निर्माण होऊ शकल्या नाहीत, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. ग्रामीण भागातील अनेक मुलांना आजही शाळेत जाण्यासाठी मोठे अंतर पार करावे लागते. काही ठिकाणी विद्यार्थ्यांना पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे आणि इतर आवश्यक सुविधांचा अभाव असल्याचा दावा दिपके यांनी केला. शेतकरी आणि कामगारांच्या मुलांनाही देशाच्या भविष्यातील पिढी म्हणून समान संधी मिळायला हवी, असे त्यांनी म्हटले. या पार्श्वभूमीवर १५ ऑगस्टपासून सुरू होणाऱ्या अभियानाचा केंद्रबिंदू सरकारी शाळांची स्थिती सुधारणे हा असेल, असे कडून सांगण्यात आले आहे. गावातील शाळांमध्ये नेमक्या कोणत्या सुविधा आहेत, कोणत्या सुविधा उपलब्ध नाहीत आणि कोणत्या बाबींमध्ये सुधारणा आवश्यक आहे, याचा आढावा घेण्यासाठी नागरिक आणि पालकांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. १५ ऑगस्टपासून सुरू होणाऱ्या या अभियानातून ग्रामीण सरकारी शाळांच्या प्रश्नाला देशव्यापी पातळीवर चर्चेत आणण्याचा चा प्रयत्न आहे. आता या आवाहनाला देशभरातील सरपंच, पालक आणि नागरिकांकडून कितपत प्रतिसाद मिळतो आणि त्यातून प्रत्यक्ष शाळांच्या सुविधांमध्ये किती बदल घडतो, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

-----------

### कोकण, घाटमाथ्यावर

अलर्ट जारी करण्यात आला असून नाशिक घाटमाथा, सातारा घाटमाथा, कोल्हापूर घाटमाथ्यासह ठाणे, मुंबई, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यांत काही ठिकाणी जोरदार पावसाचा येलो अलर्टचा अंदाज दिला आहे. तर काही ठिकाणी हलक्या सरी हजेरी लावण्याचा अंदाज हवामानशास्त्र विभागाने दिला आहे. मॉन्सूनचा आस असलेला कमी दाबाचा पट्टा राजस्थानमधील बिकानेर, उत्तर मध्य प्रदेशातील कमी दाबाच्या केंद्रातून मध्य प्रदेशातील सिधी, झारखंडमधील रांची, पश्चिम बंगालमधील दिघा ते पूर्व-मध्य बंगालच्या उपसागरापर्यंत समुद्रसपाटीपासून १.५ किलोमीटर उंचीवर सक्रिय आहे.उत्तर-पश्चिम मध्य प्रदेश आणि परिसरातील कमी दाबाचे क्षेत्र कायम असून, त्याच्याशी संबंधित चक्राकार वाऱ्यांची स्थिती समुद्रसपाटीपासून ५.८ किलोमीटर उंचीपर्यंत विस्तारली आहे.

---------

### आमदारांची फूट म्हणजे

पक्षात फूट नव्हे' शिवसेनेत फूट पडल्याच्या निवडणूक आयोगाच्या निष्कर्षावर आक्षेप घेताना सिब्बल यांनी सांगितले की, आमदारांची स्वतंत्र बैठक घेणे, स्वतंत्र गटनेता किंवा मुख्य प्रतोद नियुक्त करणे अथवा एकमेकांविरोधात अपात्रतेची कारवाई सुरू करणे, या बाबी विधिमंडळ पक्षाशी संबंधित आहेत. त्यावरून मूळ राजकीय पक्षात फूट पडल्याचा निष्कर्ष काढता येणार नाही. २१ जून, २५ जून आणि १ जुलैच्या पत्रांच्या आधारे निवडणूक आयोगाने पक्षात फूट पडल्याचे गृहीत धरले. मात्र, हा निष्कर्ष निवडणूक चिन्ह आदेशातील परिच्छेद १५ तसेच सर्वोच्च न्यायालयाने यापूर्वी घालून दिलेल्या कायदेशीर तत्त्वांच्या विरोधात असल्याचे सिब्बल यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. दहाव्या अनुसूचीतील तत्कालीन परिच्छेद ३, तसेच राणा प्रकरण आणि सुभाष देसाई प्रकरणातील सर्वोच्च न्यायालयाच्या निकालांचा दाखला देत सिब्बल यांनी मूळ राजकीय पक्षात फूट पडणे ही स्वतंत्र आणि प्राथमिक अट असल्याचे स्पष्ट केले. केवळ काही आमदारांनी वेगळा गट स्थापन केल्याने मूळ राजकीय पक्षात फूट पडली असे मानता येणार नाही, असा युक्तिवाद त्यांनी केला. शिंदे गटाने शिवसेनेची २०१८ मधील पक्षघटना लोकशाहीविरोधी असल्याचा दावा केला होता आणि निवडणूक आयोगाने तो स्वीकारला. यावरही सिब्बल यांनी गंभीर आक्षेप घेतला. ज्या २०१८ च्या पक्षघटनेनुसार शिंदे गटातील नेत्यांची विविध पदांवर नियुक्ती झाली आणि त्यांना राजकीय पदांचा लाभ मिळाला, त्याच घटनेला नंतर आव्हान देता येणार नाही, असा मुद्दा त्यांनी मांडला. पक्षाची घटना खरोखरच लोकशाहीविरोधी होती, असे मानले तर त्याच घटनेच्या आधारे मिळालेली आमदारकी आणि मंत्रीपदेही प्रश्नांकित ठरतील, असा दावा सिब्बल यांनी केला. लोकप्रतिनिधित्व कायदा, १९५१ मधील कलम २९ अ चा संदर्भ देताना सिब्बल यांनी निवडणूक आयोगाच्या अधिकारक्षेत्रावरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले. राजकीय पक्षाच्या अंतर्गत वादावर निर्णय देताना आयोगाला त्या पक्षाची घटना लोकशाहीवादी आहे की नाही, याचा निर्णय घेण्याचा अधिकार नाही, असा युक्तिवाद त्यांनी केला. गृहीत धरले की एखाद्या पक्षाची घटना लोकशाहीविरोधी आहे, तरी कलम २९अ अंतर्गत आयोगाच्या अधिकारांचा वापर करून पक्षाची नोंदणी रद्द करण्यासारखी कारवाई होऊ शकते; मात्र त्या आधारे पक्षाचे निवडणूक चिन्ह दुसऱ्या गटाला देण्याचा अधिकार आयोगाला मिळत नाही, असे सिब्बल यांनी स्पष्ट केले.

---------

### पिकनिकला गेलेल्या मावळच्या ४

धडकली आणि त्यानंतर पलटी होत विरुद्ध दिशेच्या लेनमध्ये गेली. याचवेळी समोरून येणाऱ्या आयशर ट्रकला कारने जोरदार धडक दिली. या भीषण धडकेत चार तरुणांचा जागीच मृत्यू झाला. अपघाताचे दृश्य अत्यंत विदारक होते. अवघ्या १९ ते २० वर्षांच्या तरुणांचा असा दुर्दैवी अंत झाल्याने मावळ आणि तळेगाव दाभाडे परिसरावर शोककळा पसरली आहे. या दुर्घटनेत दीक्षित दयानंद पुजारी आणि मयूर हनुमंत शिंदे हे गंभीर जखमी झाले आहेत. दोघांनाही तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. अपघाताची माहिती मिळताच सारोळा येथील महामार्ग पोलीस मदत केंद्राचे अधिकारी आणि कर्मचारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी मदतकार्य करत अपघातग्रस्त वाहने क्रेनच्या सहाय्याने रस्त्याच्या बाजूला हटवली. त्यानंतर महामार्गावरील वाहतूक सुरळीत करण्यात आली. दरम्यान, अपघात नेमका कोणत्या कारणामुळे झाला, याचा अधिक तपास पोलीस करत आहेत

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
बुधवार, दि. १२ ऑगस्ट २०२६


## थोडक्यात



### मोठेवाडीत श्री संत सावता महाराजांची पुण्यतिथी

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील मोठेवाडी येथील श्री संत शिरोमणी सावता माळी महाराज मंदिरात श्री संत सावता महाराज यांची पुण्यतिथी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

तालुक्यातील मोठेवाडी येथे संत सावता महाराज पुण्यतिथी व सावता महाराज ग्रंथ समाप्ती निमित्त सकाळी गावातुन टाळ मृदंग व विठू नामाच्या गजरात ग्रंथ दिंडी काढण्यात आली. सकाळी ११:०० ते ०१:०० वाजण्याच्या सुमारास श्री.ह.भ.प. बाळू महाराज उगले यांच्या मधुरमय वाणीतून सुश्राव्य हरी किर्तन झाले व दहीहंडी नंतर महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. या किर्तन श्रवणाचा व महाप्रसादाचा शेकडो भाविक भक्तांनी लाभ घेतला. कार्यक्रम चैतन्यदायी करण्यासाठी रामभाऊ खेत्री, मलकार्जुन खेत्री, रघुनाथ खेत्री, मधुकर सर्जे, राधेश्याम खेत्री, शेषेराव किनोळकर,भास्कर खेत्री, बबनतात्या खेत्री, रामेश्वर यादव यांच्यासह ग्रामस्थांनी परिश्रम घेतले

### ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक आबासाहेब कोळपे यांचे निधन

वडवणी । प्रतिनिधी

मराठवाडा मुक्ती संग्रामातील अग्रणी स्वातंत्र्यसैनिक आणि चिंचाळा तालुका वडवणी जिल्हा बीड येथील रहिवासी आबासाहेब



तात्याबा कोळपे (वय १०२) यांचे सोमवारी (दि. १०) राहत्या घरी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर सोमवारी सायंकाळी चिंचाळा येथील स्मशानभूमीत हजारो नागरिकांच्या उपस्थितीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

आबासाहेब कोळपे यांनी तरुण वयातच मराठवाडा मुक्ती संग्रामात सहभाग घेतला होता. स्व. गोविंदभाई श्रॉफ, काशीनाथराव जाधव, स्व. रामराव आवरगावकर व कॉ. गंगाधर अप्पा बुरांडे यांच्यासोबत त्यांनी लढ्यात योगदान दिले. रझाकारांविरोधातील धाडसी मोहिमेतही त्यांचा सहभाग होता. क्रांतीसिंह नाना पाटील यांचे ते निकटवर्तीय व खंदे समर्थक म्हणून ओळखले जात. तत्कालीन मुख्यमंत्री स्व. वसंतराव नाईक यांनी १९६५ च्या सुमारास त्यांचा गौरव केला होता. २०२३ मध्ये मराठवाडा मुक्ती दिनाच्या अमृतमहोत्सवानिमित्त बीड जिल्हा प्रशासनानेही त्यांचा सन्मान केला होता. त्यांच्या पश्चात तीन मुले, तीन मुली, सुना, जावई, नातवंडे व पतवंडे असा परिवार आहे.

**'आबासाहेब कोळपेंच्या स्मृती अविस्मरणीय' – धनंजय मुंडे**

मराठवाडा मुक्तिसंग्रामातील ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक आबासाहेब कोळपे यांच्या निधनाने एका संघर्षमय पर्वाचा साक्षीदार हरपला आहे, अशी भावना माजी मंत्री धनंजय मुंडे यांनी व्यक्त केली. ऐन तारुण्यात आबासाहेबांनी स्वतःला मराठवाडा मुक्तिसंग्रामाच्या लढ्यात झोकून देत स्व. गोविंदभाई श्रॉफ, स्व. काशीनाथराव जाधव, स्व. रामराव आवरगावकर आदींसोबत नेटाने लढा दिला. तसेच बीडचे माजी खासदार क्रांतिसिंह नाना पाटील यांचे ते निकटचे सहकारी होते.

सन २०२३ मध्ये मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाच्या अमृतमहोत्सवी कार्यक्रमात तत्कालीन पालकमंत्री म्हणून आपल्या हस्ते आबासाहेब कोळपे यांचा विशेष गौरव करण्यात आला होता. ही आठवण सदैव अविस्मरणीय राहील, असे मुंडे यांनी सांगितले. ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक स्व. आबासाहेब कोळपे यांच्या स्मृतींना त्यांनी भावपूर्ण आदरांजली अर्पण केली.

# सहा डिसेंबर पर्यंत आरक्षण उपवर्गीकरण मागे घ्या अन्यथा याद राखा-सरसेनानी आनंदराज आंबेडकर

अंबाजोगाई । प्रतिनिधी

सहा डिसेंबर पर्यंत आरक्षण उपवर्गीकरण मागे घेतले नाही तर याद राखा असे खडेबोल मा.आनंदराज आंबेडकर यांनी व्यक्त केले.अनुसूचित जातीच्या आरक्षणाच्या उपवर्गीकरणाच्या प्रक्रियेला तीव्र विरोध दर्शविण्यासाठी आरक्षण उपवर्गीकरण विरोधी कृती समितीच्या वतीने शहरात भव्य मोर्चा काढण्यात आला. मोर्चात विविध सामाजिक संघटना, पदाधिकारी,कार्यकर्ते तसेच अनुसूचित जाती समाजातील नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

पुढे बोलताना आनंदराज आंबेडकर म्हणाले की,भिमा कोरेगावचा ईतिहास विसरू नका. आंबेडकर वाद्यांच्या नादी लागु नका.एक लढाई जंतरमंतरवर झाली प्रधान गेला. आम्ही उतरलो तर देवेंद्र-नरेंद्र जातील. आरक्षण उपवर्गीकरण करून आंबेडकर वाद्वायांचे खचीकरण करायचे प्रयत्न हानून पाडूयात. रस्त्यावरची ताकदीला सरकार घाबरले आहेत. सहा डिसेंबर पर्यंत उपवर्गीकरण मागे घेतले नाही. तर मग दाखवून देवू कोण किती पाण्यात आहे. या देशातील जनता सार्वभौम आहे.आंदोलन चालूच राहील, पुढील लढाई साठी आपण सर्वांनी तयार रहावे असे आवाहन केले. यावेळी अँड.सुरेश माने,काँ.बब्रुवाहन पोटभरे,रुक्मिणीताई लोंढे,नरसिंगे सर,रोहीदास बन्सोडे,यांच्यासह इतरांनी आपले मनोगत व्यक्त केले. अनुसूचित जातीच्या आरक्षणाच्या उपवर्गीकरणाबाबत सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर राज्य शासनाकडून सुरू असलेल्या पुढील प्रक्रियेला विरोध करण्यासाठी हा मोर्चा काढण्यात येत आहे. अनुसूचित जातीच्या आरक्षणाचे उपवर्गीकरण तात्काळ रद्द करावे, अशी प्रमुख मागणी कृती समितीच्या वतीने करण्यात आली आहे.

कृती समितीच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदन



### आरक्षण उपवर्गीकरणाच्या विरोधात अंबाजोगाईत महामोर्चा

सादर करण्यात आले असून, त्यामध्ये अनुसूचित जाती आरक्षण उपवर्गीकरणाची प्रक्रिया रद्द करण्यासह विविध मागण्या करण्यात आल्या आहेत. तसेच उपवर्गीकरणासंदर्भात स्थापन करण्यात आलेल्या समितीचा अहवाल अद्याप सार्वजनिक करण्यात आलेला नसल्याचा मुद्दाही निवेदनातून उपस्थित करण्यात आला आहे. संबंधित अहवाल तातडीने जाहीर करावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

**समितीच्या प्रमुख मागण्या**

अनुसूचित जाती आरक्षणाच्या उपवर्गीकरणाची प्रक्रिया तात्काळ रद्द करण्यात यावी, उपवर्गीकरणाबाबत स्थापन करण्यात आलेल्या समितीचा अहवाल तातडीने सार्वजनिक करावा, अनुसूचित जातीतील २ लाख ५० हजार मागासवर्गीय सरकारी नोकऱ्यांच्या अनुशेषाची भरती तातडीने करण्यात यावी, अनुसूचित जातीतील लोकसंख्येच्या वाढीचा विचार करून आरक्षणाचे प्रमाण योग्य पद्धतीने निश्चित करावे, मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीत भरीव वाढ करावी, अनुसूचित जाती समाजाच्या मागण्यांबाबत महाराष्ट्र शासनाने सहानुभूतीपूर्वक व सकारात्मक भूमिका घ्यावी.निवेदनावर संयोजक समितीचे पदाधिकारी, संयोजक समितीचे अध्यक्ष भिमराव सरवदे, स्वागताध्यक्ष काँ.बब्रुवाहन पोटभरे, सदस्य ऍड.माणिक आदमाने, सुधाकर हातागळे,श्रीधर सिरसट, दशरथ सोनवणे, आरुण बनसोडे, संजय वाघमारे यांच्यासह इतरांच्या स्वाक्षऱ्या आहेत.समितीने अनुसूचित जातीच्या आरक्षणाचे विभाजन करण्याऐवजी सामाजिक न्यायाच्या मूलभूत उद्देशाचा विचार करण्याची मागणी केली आहे. आरक्षणाचा लाभ संबंधित समाजातील गरजू घटकांना मिळावा, मात्र त्यासाठी आरक्षणाचे अंतर्गत विभाजन करण्याऐवजी प्रलंबित अनुशेष भरती, शैक्षणिक सुविधा आणि विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीत वाढ यांसारख्या उपाययोजना करण्यावर शासनाने भर द्यावा, अशी भूमिका समितीने मांडली आहे. आरक्षणाचे विभाजन नको, सामाजिक न्याय हवा या भूमिकेतून आजचा मोर्चा आयोजित करण्यात आला असून, अंबाजोगाई शहरात या आंदोलनाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. मोर्चाच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाकडून आवश्यक खबरदारी घेण्यात येत आहे. शांततेच्या मार्गाने मोठ्या संख्येने नागरिकांनी मोर्चात सहभागी होऊन आपल्या मागण्यांसाठी आवाज बुलंद करावा, असे आवाहन आरक्षण उपवर्गीकरण विरोधी कृती समिती, अंबाजोगाई यांच्या वतीने करण्यात आले आहे.यावेळी विविध संघटनांनी अल्पोपहार, फलाहार,पाणी बाँटल,जार,शरबतची व्यवस्था करण्यात आली होती. महामोर्चा यशस्वी करण्यासाठी अंबाजोगाई तालुक्यातील सर्व कार्यकर्ते यांनी परिश्रम घेतले.

## आदिवासी दिनी आश्रमशाळेत कायदेविषयक जनजागृती शिबीर संपन्न
## कायदा समाजाच्या उन्नतीसाठी काम करतो -अ‍ॅड.नारायण गोले पाटील

**माजलगाव । प्रतिनिधी**

जागतिक आदिवासी दिनानिमित्त तालुक्यातील प्राथमिक व माध्यमिक आश्रम शाळा रामनगर छोटीवाडी येथे विधी सेवा प्राधिकरण व वकील संघ माजलगाव यांच्या संयुक्त विद्यमाने काल दि.१० ऑगस्ट सोमवार रोजी कायदेविषयक जनजागृती शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.



बिरसा मुंडा आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली.

या शिबिराच्या अध्यक्षस्थानी वकील संघाचे अध्यक्ष भाई ड. नारायण गोले पाटील हे होते. यावेळी बोलताना ते म्हणाले की, उपेक्षित व दुर्बल घटकांच्या हक्कांचे संरक्षण कायदा करतो. व समाजाच्या उन्नतीसाठी कायदा महत्वाची भूमिका बजावतो. त्यामुळे विद्यार्थ्यांनी कायद्यासह आपले हक्क आणि कर्तव्ये जाणून घेतली पाहिजेत.वनहक्क कायदा, पेसा कायदा आणि अत्याचार प्रतिबंधक कायद्याबत विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन देण्यात आले. शिबिराला विद्यार्थ्यांचा मोठा प्रतिसाद मिळाला. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ड. टी. पी. रेडे, ड. पी. पी. गोंडे, एम. डी. गायकवाड, जी. व्ही. पाटील, प्रतीक्षा कोठावळे, पी. एल. व्ही. जिल्हा न्यायालय बीड, चन्नलवाड बी. पी., राहुल सोनसळे, दत्तात्रय हुंबे, ज्ञानेश्वर सावंत यांच्यासह शाळेचे मुख्याध्यापक सी. व्ही. मठपती, आर. एन. रोकडे, आर. डी. जमजाळ, एन. बी. मादरपल्ली आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रतीक्षा कोठावळे यांनी केले.तर सूत्रसंचालन धनश्री इंगळे आणि उत्कर्षा घाडगे यांनी केले. शेवटी आभार मुख्याध्यापक चनबस आप्पा मठपती यांनी मानले.

## सत्ताधारी नगरसेविकेचेच नगर परिषदेसमोर उपोषण; माजलगाव नगर परिषदेतील अंतर्गत नाराजी चव्हाट्यावर

**प्रभाग १३ मधील नागरी समस्यांकडे दुर्लक्षाचा आरोप**

माजलगाव । प्रतिनिधी

येथील नगरपरिषदेतील सत्ताधारी गटातील अंतर्गत नाराजी आता उघडपणे समोर आली आहे. प्रभाग क्रमांक १३ मधील विविध नागरी समस्यांकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप करीत बहुजन विकास मोर्चाच्या नगरसेविका उषा अशोक लांडगे यांनी उपोषणाचा मार्ग स्वीकारला आहे. यासंदर्भात त्यांनी नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांना निवेदन देत प्रभागातील समस्यांवर तातडीने कार्यवाही करण्याची मागणी केली आहे.




नगरसेविका लांडगे यांनी दिलेल्या निवेदनानुसार, प्रभाग क्रमांक १३ मधील नागरिकांच्या विविध समस्यांबाबत संबंधित विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना वारंवार सूचना देण्यात आल्या. मात्र, त्यानंतरही अपेक्षित कार्यवाही होत नसल्याचा आरोप त्यांनी केला आहे. प्रभागातील रस्त्यांची दुरवस्था, नाल्यांची स्वच्छता, कचरा उचलण्यातील दिरंगाई, मोकाट जनावरांचा वाढता उपद्रव तसेच अन्य मूलभूत नागरी सुविधांच्या प्रश्नांकडे नगर परिषद प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.



## विभागीय माहिती कार्यालयात सहाय्यक संचालकपदी सुरेश पाटील रुजू

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी**

**छत्रपती संभाजीनगर येथील विभागीय माहिती कार्यालयातील सहाय्यक संचालक (वर्ग-२, राजपत्रित) पदावर सुरेश पाटील रुजू झाले. उपसंचालक प्रवीण टाके यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत केले.**

**विद्यमान सहाय्यक संचालक गणेश फुंदे यांची जिल्हा माहिती अधिकारी, पुणे येथे बदली झाल्याने रिक्त झालेल्या पदावर पाटील यांनी फुंदे यांच्याकडून पदभार स्वीकारला.उपसंचालक प्रवीण टाके यांच्या मार्गदर्शनात ते काम करणार आहेत.**

सहाय्यक संचालकपदी रुजू होण्यापूर्वी पाटील हे शिर्डी येथे माहिती अधिकारी म्हणून कार्यरत होते. या सेवाकाळात त्यांनी जळगाव आणि अहिल्यानगर जिल्हा माहिती अधिकारी पदाचा कार्यभारही सांभाळला. सुरेश पाटील यांनी पत्रकारितेतील पदव्युत्तर पदवी प्राप्त केली आहे. दैनिक सकाळ, पुढारी आणि सायं दैनिक लोकमान्य सांजवर्ता या वृत्तपत्रांमध्ये त्यांनी बातमीदारी केली आहे.याशिवाय प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग, नाशिक यांच्या कार्यालयात जनसंपर्क अधिकारी म्हणून कार्यरत होते. छत्रपती संभाजीनगर विभागातील वृत्त व माहितीसाठी त्यांच्याशी दूरध्वनी क्रमांक ७०२८५८६९१९ वर संपर्क साधता येईल.

## महर्षी चरकाचार्य जयंतीनिमित्त बीडमध्ये आदित्य आयुर्वेद महाविद्यालयाची भव्य ग्रंथदिंडी

### आयुर्वेदाच्या समृद्ध ज्ञानपरंपरेचा जयघोष; विद्यार्थी, प्राध्यापकांचा उत्स्फूर्त सहभाग

बीड । प्रतिनिधी

आयुर्वेदाचे आद्य आचार्य महर्षी चरकाचार्य यांच्या जयंतीचे औचित्य साधून आदित्य आयुर्वेद महाविद्यालयाच्या वतीने बीड शहरात अत्यंत उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात भव्य ग्रंथदिंडी काढण्यात आली. आदित्य शिक्षण संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ. आदित्य सारडा आणि संचालिका डॉ.आदिती सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

आयुर्वेदाच्या समृद्ध ज्ञानपरंपरेचा प्रसार व्हावा, तसेच विद्यार्थ्यांमध्ये आयुर्वेदाविषयी अभिमान व महर्षी चरकांच्या कार्याबद्दल आदर निर्माण व्हावा, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. दरवर्षीप्रमाणे यंदाही 'चरक सप्ताह' साजरा केला जात असून, या सप्ताहाची सुरुवात या नयनरम्य दिंडीने झाली. ग्रंथदिंडीमध्ये टाळकरी विद्यार्थिनींनी




मृदंगाच्या साथीने वारकऱ्यांचे ६ विविध ताल व फुगडीचे अप्रतिम संचलन सादर केले.लेझीम पथकाने ५ ताल आणि स्वस्तिक संचलन करून उपस्थितांची मने जिंकली. ढोल पथकाच्या ६ तालांच्या गजराने परिसर दुमदुमून गेला. तसेच, विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या पथनाट्यातून उपस्थितांना आयुर्वेदातील 'पंचकर्म चिकित्सेचे' महत्त्व पटवून देण्यात आले. ही भव्य ग्रंथदिंडी महाविद्यालयातून निघून डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा, बालाजी मंदिर, विठ्ठल मंदिर मार्गे काळा हनुमान ठाणा मंदिरापर्यंत काढण्यात आली. दिंडीत विद्यार्थ्यांनी हातामध्ये आयुर्वेदाचे पवित्र ग्रंथ, महर्षी चरकाचार्य यांची प्रतिमा आणि आरोग्यविषयक प्रबोधनात्मक फलक घेतले होते. आयुर्वेद अमर रहे अशा घोषणांनी संपूर्ण परिसर चैतन्यमय झाला होता.या ग्रंथदिंडीच्या यशस्वी आयोजनासाठी आदित्य आयुर्वेद महाविद्यालयाचे प्राचार्य वैद्य विवेक कुलकर्णी यांच्यासह डॉ. विनोद राहिंज, डॉ. चेतन सराफ, डॉ. मयूरी शिंदे, डॉ. प्रेरणा गायकवाड, डॉ. प्रशांत नाकाडे, डॉ. कृष्णा शिंदे आणि प्रा. रामेश्वर ढोबळे यांच्यासह सर्व प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. या उपक्रमामुळे बीड शहरातील नागरिकांमध्ये आयुर्वेदाबद्दल विशेष जागरूकता आणि कुतूहल निर्माण झाले आहे.

**विद्यार्थ्यांचे संचलन अनुभवाची मोलाची शिदोरी: सुभाषचंद्र सारडा**

दिंडीतील विद्यार्थ्यांचे शिस्तबद्ध, कलात्मक संचलन आणि उत्साह पाहून आदित्य शिक्षण संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा यांनी विद्यार्थ्यांचे भरभरून कौतुक केले. आयुर्वेदाची ही समृद्ध सांस्कृतिक आणि वैद्यकीय परंपरा जोपासणे ही काळाची गरज आहे.आजच्या या उपक्रमाचा अनुभव विद्यार्थ्यांसाठी त्यांच्या भावी आयुष्यात मार्गदर्शक अनुभवाची मोलाची शिदोरी ठरेल,असा विश्वास त्यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात व्यक्त केला.

## पान ६ वरुन...

### बीड शहरातील वाढती

बीड शहराचा वाढता विस्तार आणि नागरिकांची होणारी गैरसोय पाहता हा बायपास होणे अत्यंत गरजेचे आहे. यामुळे केवळ प्रवास सुरक्षित आणि सुलभ होणार नाही, तर बीड शहराच्या आणि परिसराच्या आर्थिक गतिविधींना मोठी चालना मिळणार असल्याचे आ.क्षीरसागर म्हटले आहे. या महत्त्वपूर्ण रस्त्याच्या कामाला लवकरात लवकर मंजुरी देऊन आवश्यक निधी उपलब्ध करून द्यावा, अशी आग्रही मागणी त्यांनी या भेटीदरम्यान केली आहे. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी या प्रस्तावाचे गांभीर्य ओळखून सकारात्मक प्रतिसाद दिला असून, प्रशासनाला तातडीने पुढील पावले उचलण्याचे आदेश दिले आहेत. बीडच्या विकासासाठी आवश्यक असलेल्या प्रत्येक प्रश्नाचा सातत्याने पाठपुरावा करत राहू आणि शहराच्या विकासाच्या वाटचालीत कोणतीही कमतरता राहू देणार नाही, असा विश्वास आ. संदीप क्षीरसागर यांनी यावेळी व्यक्त केला आहे.

### डायल ११२ वर खोटी माहिती

पोलीस निरीक्षक दीपक लंके पुढील तपास करत आहेत. बीड जिल्हा पोलीस दलाने नागरिकांना आवाहन केले आहे की, डायल ११२ ही एक अत्यंत महत्त्वाची आपत्कालीन सेवा आहे. यावर केवळ गरजू व्यक्तींनीच संपर्क साधावा. खोटी माहिती दिल्यास अशा व्यक्तींवर कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल, असा इशारा पोलिसांनी दिला आहे.

### डॉक्टर हे देशाच्या आरोग्य

पालक, शिक्षक, प्रतिष्ठानचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन देवदूत प्रतिष्ठानचे अध्यक्ष बंडूजी खांडेकर यांनी तर आभार सचिव शिवाजी हंगरगे यांनी मानले. या सत्कारामुळे इतर विद्यार्थ्यांनाही प्रेरणा मिळाली असून, देवदूत प्रतिष्ठानच्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे. यावेळी उपस्थित सर्वच मान्यवरांनी विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी मोलाचे मार्गदर्शन केले. नीट मधील यश ही फक्त सुरुवात आहे. डॉक्टर बनून समाजाची, विशेषतः गोरगरीब रुग्णांची सेवा करणे हे तुमचे खरे ध्येय असावे. आयुष्मान भारत सारख्या योजनांमधून तुम्ही देशाच्या आरोग्य व्यवस्थेत मोठा बदल घडवू शकता. कठोर परिश्रम, चिकाटी आणि सकारात्मक दृष्टिकोन यांच्या जोरावर कोणतेही ध्येय साध्य करता येते.

– डॉ.ओमप्रकाश शेटे (अध्यक्ष आयुष्मान भारत, समिती)

### हर घर तिरंगा अभियान

विशिष्ट वेळ किंवा दिवसाचे कोणतेही बंधन असणार नाही. नागरिक आपल्या सोयीनुसार कोणत्याही वेळी ध्वज फडकवू शकतात. केंद्र शासनाने नियमांमध्ये सूट देण्यात आली असली तरी राष्ट्रध्वजाची प्रतिष्ठा अबाधित राखणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. त्यामुळे फाटलेला, चुरगळलेला किंवा चुकीच्या पद्धतीने ध्वज फडकवला जाणार नाही, याची प्रत्येकाने काळजी घ्यावी असे आवाहनही करण्यात आले आहे.

### रोहयो मंत्री भरतशेठ

रस्त्याची पाहणी तसेच नळ पाणीपुरवठा योजनेचे लोकार्पण करण्यात येणार आहे. यासोबतच एक लाख वृक्ष लागवड कामाचीही ते पाहणी करणार आहेत. सायंकाळी ६ वाजता मौजे मानेवाडी येथील विकास कामांचे लोकार्पण मंत्री गोगावले यांच्या हस्ते होणार आहे. कार्यक्रम झाल्यानंतर ७ वाजता ते रायगडकडे प्रयाण करतील.दरम्यान, हॉटेल ग्रॅण्ड यशोदा येथे होणाऱ्या बैठकीत जिल्ह्यातील विविध भागांतील पक्षसंघटनेचा आढावा, स्थानिक पातळीवरील अडचणी, कार्यकर्त्यांचे प्रश्न आणि संघटनात्मक बाबींवरही बैठकीत चर्चा होणार आहे. संपर्क मंत्री गोगावले पक्षाच्या आगामी कार्यक्रमांचे नियोजन आणि कार्यकर्त्यांना आवश्यक मार्गदर्शन करणार आहेत. या बैठकीस जिल्ह्यातील शिवसेनेचे पदाधिकारी आणि शिवसैनिक उपस्थित राहणार आहेत. बैठकीत जिल्ह्यातील पक्षसंघटनेचा आढावा घेण्यात येणार आहे. तसेच पक्षाच्या कामकाजासंदर्भात पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांशी चर्चा होणार आहे. बैठकीस पदाधिकारी, महिला आघाडीच्या पदाधिकारी व शिवसैनिकांनी उपस्थित राहावे असे आवाहन जिल्हाप्रमुख अनिल जगताप, सचिन मुळूक, स्वप्नील गलधर, चंद्रकांत नवले यांनी केले आहे.

### वारकरी संप्रदायाची आचारसंहिताच

औषधोपचार न करता बरे केले असे म्हणणे आहे. सावता महाराज दर एकादशीला पंढरपूरला जात होते. त्यामुळे सावता महाराज पंढरपूरला गेलेच नाहीत हा गैरसमज कोणी करून घेऊ नये. महाराष्ट्राची परंपरा संतांमुळे थोर आहे अशा संतांनी महाराष्ट्रामध्ये आज हजारो कीर्तनकार उभे केलेले आहेत. आणि या कीर्तनकाराच्या माध्यमातून समाजाला दिशा देण्याचे काम निरंतर चालू आहे. असे महादेव महाराज जवळेकर यांनी यावेळी बोलताना सांगितले. याप्रसंगी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर, डॉ. योगेश शिरसागर, आमदार विजयसिंह पंडित, भाजपाचे नवनाथ शिराळे आदींची उपस्थिती होती.

### तुकाराम मुंडे यांच्या प्रशासकीय

आणि समाजासाठी योगदान देण्याची प्रेरणा देईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.उद्याच्या पिढ्यांचे भवितव्य उज्ज्वल व्हावे, अशी इच्छा असेल तर आज ठामपणे उभे राहावे लागेल. सक्षम लोकशाहीसाठी नागरिकांचे राजकारण उभे राहणे ही पूर्वअट आहे. नागरिकांचा सक्रिय सहभाग महत्त्वाचा आहे. नागरिकांनी भूमिका घेतली पाहिजे आणि व्यवस्थेला जाब विचारला पाहिजे, असेही संजय आवटे म्हणाले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक बिंदुसरा सांस्कृतिक सामाजिक प्रतिष्ठानचे अध्यक्ष महादेव धांडे यांनी केले. हा सोहळा यशस्वी करण्यासाठी सदस्य प्रा. चाँद पटेल, सुहास सर्वज्ञ, बाळासाहेब घुमरे, ड. सादेक शेख, आनंद सारडा, सुरेश माने आणि बप्पासाहेब तळेकर यांनी पुढाकार घेतला. समन्वयक म्हणून ड. योगेश शिंदे यांनी जबाबदारी सांभाळली. सूत्रसंचालन राहुल गिरी यांनी केले, तर आभार प्रतिष्ठानचे सचिव ड. सुरेश वडमारे यांनी मानले. कार्यक्रमाची सांगता सामूहिक राष्ट्रगीताने झाली.

**शिक्षणातून परिवर्तनाची दिशा : माजी सनदी अधिकारी अशोकराव मुंडे**

देशाच्या प्रगतीसाठी शिक्षण हे प्रभावी माध्यम आहे. शिक्षणामुळे व्यक्तीच्या विचारांना दिशा मिळते आणि समाजाच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळते. त्यामुळे प्रत्येकाने शिक्षणाचे महत्त्व ओळखून पुढील पिढीला शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन माजी सनदी अधिकारी अशोकराव मुंडे यांनी केले. अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत शिक्षण घेत सातत्य, जिद्द आणि चिकाटीच्या बळावर यूपीएससी आणि एमपीएससीसारख्या स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळवत वर्ग-१ अधिकारी पदापर्यंत पोहोचलेल्या तुकाराम यांच्या संघर्षाचा यावेळी प्रेरणादायी उदाहरण म्हणून उल्लेख करण्यात आला. परिस्थिती कितीही प्रतिकूल असली तरी ध्येय निश्चित ठेवून प्रयत्न केल्यास यश मिळवता येते, असा संदेश त्यांच्या प्रवासातून मिळतो, असे अशोकराव मुंडे यांनी सांगितले. जीवनातील अडचणींच्या काळात साथ देणाऱ्या व्यक्तींप्रती कृतज्ञता बाळगणे ही सामाजिक जाणीव आहे. जिद्द, चिकाटी आणि सकारात्मक विचारांच्या जोरावर कोणत्याही संकटावर मात करता येते, असा विश्वासही अशोकराव मुंडे यांनी व्यक्त केला.

# तामिळनाडूत उसाला ४ हजार भाव; भातालाही २८९ रुपये अनुदान

तामिळनाडूचे मुख्यमंत्री सी. जोसेफ विजय यांनी राज्यातील भात आणि उसासाठी अनुदानाची घोषणा केली. उसासाठी ७०९ रुपये प्रतिटन असून जाहीर केले आहे त्यामुळे गेल्या गाळप हंगामातील उसासाठी शेतकऱ्यांना एकूण ४ हजार रुपये भाव हाती पडणार आहे. तर भातासाठीही २८९ रुपये अनुदान जाहीर केले आहे. राज्याची सध्याची आर्थिक स्थिती फारशी चांगली नसतानाही शेतकऱ्यांच्या हितासाठी हा निर्णय घेण्यात आल्याचे मुख्यमंत्री विजय यांनी सांगितले.

तमिळनाडू सरकार भात आणि उसासाठी अनुदान देत असते. तामिळनाडूचे मुख्यमंत्री सी. जोसेफ विजय यांनी राज्यातील ऊस उत्पादकांसाठी हंगाम २०२५-२६ साठीच्या अनुदानाची घोषणा केली. उसाच्या अनुदानात गेल्यावर्षीच्या तुलनेत ३६० रुपये वाढ करून ७०९ रुपये जाहीर केले. केंद्र सरकारची एफआरपी ९.५ टक्के उताऱ्यासाठी ३२९० रुपये होती. यावर तमिळनाडूतील शेतकऱ्यांना ७०९ रुपये अनुदान मिळाणार आहे.



त्यामुळे उस उत्पादकांना एकूण ४ हजार रुपये मिळणार आहेत. शेती आणि ग्रामीण उपजीविकेला चालना देण्यासाठी राज्य सरकार शेतकऱ्यांच्या प्रयत्नांना खंबीरपणे साथ देईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री विजय यांनी दिली. ते म्हणाले, ''भात आणि ऊस पिकवणाऱ्या शेतकऱ्यांचे कल्याण आणि हित जपणे आवश्यक आहे. त्यामुळे तामिळनाडूच्या इतिहासात प्रथमच भात आणि ऊसासाठी राज्य सरकारकडून अभूतपूर्व पातळीवर अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. गेल्या पाच वर्षांत ऊसाच्या अनुदानात केवळ १५६ रुपयांची वाढ करण्यात आली होती. मात्र, यंदा पहिल्यांदाच ३६०.५० रुपयांची वाढ करण्यात आली आहे,'' अशी माहिती मुख्यमंत्री विजय यांनी विधानसभेत नियम ११० अंतर्गत दिली. तमिळनाडूत १ सप्टेंबरपासून भात खरेदीचा हंगाम सुरू होणार आहे. केंद्र सरकारच्या हमीभावावर राज्य सरकारकडून प्रोत्साहन अनुदान देण्यात येणार आहे. उत्तम प्रतिच्या भातासाठी २८९ रुपये आणि सामान्य प्रतीच्या भातासाठी १५६ रुपये अनुदान राज्य सरकारने जाहीर केले आहे. त्यामुळे उत्तम प्रतीच्या भातासाठी एकूण खरेदी किंमत २,७५० रुपये प्रति क्विंटल असणार आहे, तर तर सामान्य प्रतीच्या भाताची खरेदी किंमत २,६०० रुपये प्रति क्विंटल असेल.

# केळीवरील पनामा रोग, असा करा बंदोबस्त



केळीच्या पिकाला पनामा नावाच्या बुरशीमुळे होणाऱ्या रोगाचा मोठा धोका असतो. जो एकदा शेतात आल्यास ३० वर्षापर्यंत मातीतून जात नाही. या रोगाला फ्युजेरियम विल्ट असेही म्हणतात.पनामा रोग उष्णकटिबंधीय प्रदेशांमध्ये केळीच्या लागवडीसाठी एक मोठा धोका आहे. पनामा रोगाची लक्षणे आणि प्रसारफ्युजेरियम ऑक्सिस्पोरम ही बुरशी केळीच्या कोवळ्या मुळांवर किंवा मुळांच्या तळावर हल्ला करते. यामुळे मुळांच्या गाठी आणि पानांच्या तळांवर वेगाने हल्ला होतो. ज्या शेतात या रोगाचा प्रादुर्भाव होतो, त्या शेतकऱ्यांनी विशेष खबरदारी घेणे आवश्यक आहे.

पनामा रोगामुळे काय होते :पानांचे अचानक वाळणे व गळणे मुळांवर गाठी व सडखोडामध्ये तपकिरी पट्टे दिसतात. हा आजार मातीतून व पाण्याद्वारे संक्रमित होतो. एकदा शेतात आल्यास रोग ३० वर्षापर्यंत मातीत राहतो.

पनामा रोगापासून बचावासाठी उपाययोजना : रोगमुक्त रोपांची निवड करारवी. विश्वसनीय स्त्रोतांकडूनच रोपे खरेदी करावीत. शेतामधील निचरा सुधारावा. पाणी साचणार नाही याची काळजी घ्या. फेरपालट करा. एकाच जमिनीत सतत केळी न लावता अन्य पिके घ्यावीत. संसर्ग झालेला भाग वेगळा करावा. रोगट झाडे उखडून नष्ट करावीत. जमिनीची स्टीमिंग / सौर निर्जंतुकीकरण शक्य असल्यास करावे.

# खरिपात मका लागवड अधिक फायदेशीर

खरीप हंगामात अनेक पिके घेतली जात असली तरी. देशाच्या बहुतांश भागात भात किंवा मक्याची लागवड केली जाते. मात्र, शेतकरी अनेकदा संभ्रमात पडतात की मका पिकवायचा की भात? जर आपण भाताबद्दल बोललो तर ते खरीप हंगामातील मुख्य पीक आहे. देशात धानाची लागवड मोठ्या प्रमाणावर केली जाते. मात्र धानापेक्षा मका शेती ही शेतकऱ्यांना जास्त फायदेशीर आहे. धानाच्या तुलनेत मका लागवडीत शेतकऱ्यांना दुप्पट नफा मिळू शकतो. देशात वर्षभर मक्याची लागवड केली जाते. पाणी उपलब्ध असताना विविध भागातील शेतकरी वर्षभर शेती करतात. परंतु हे प्रामुख्याने खरीप पीक मानले जाते. खरीप हंगामात याची लागवड मोठ्या प्रमाणात केली जाते. विशेषतः ज्या राज्यांमध्ये शेतकरी पावसावर आधारित सिंचनावर अवलंबून आहेत. त्या राज्यांमध्ये शेतकरी पावसाळ्यात वरच्या जमिनीवर मका पिकवतात आणि त्याच्या लागवडीतून चांगले उत्पादन मिळते. मक्याचा भावही चांगला असेल तर त्याची विक्री करून शेतकऱ्यांना चांगला नफा मिळतो. विशेषत: मक्यावर प्रक्रिया केल्यानंतर त्यापासून अनेक उत्पादने तयार केली जातात. त्यामुळे त्याला बाजारपेठेत मोठी मागणी आहे.

खरिपातच अधिक मका असण्याचे कारण : खरीप हंगामात मका लागवड केल्याने हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर पीक चक्र सुधारण्यास मदत होते आणि शेतकऱ्यांना अधिक नफाही मिळतो. कमी पावसातही तयार होणारे आणि चांगले उत्पादन देणारे हे पीक आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना याचा लाभ मिळतो.



भातशेतीत उत्पादन थोडे कमी झाले तर भार पडतो. भातशेतीपेक्षा मक्याच्या शेतीतून जास्त उत्पन्न मिळते.

मका शेतीत नफा : मक्याची लागवड करून शेतकरी हेक्टरी ६८ हजार रुपयांपर्यंत निव्वळ उत्पन्न मिळवू शकतात. तर भातशेती करून शेतकऱ्यांना केवळ ३५ हजार रुपये प्रति हेक्टर निव्वळ नफा मिळू शकतो. त्यामुळे या बातमीत आम्ही तुम्हाला खरीप हंगामात मका पिकवणे अधिक फायदेशीर का आहे हे सांगणार आहोत. अधिकाधिक शेतकरी शेती करून चांगला नफा मिळवू शकतात आणि त्यांचे उत्पन्न वाढवू शकतात.

पाण्याची कमी गरज : मका पिकाला खूप कमी पाणी लागते. एकीकडे मका पिकवण्यासाठी ६२७-६२८ मिमी/हेक्टर पाणी लागते, तर भात पिकवण्यासाठी सरासरी १०००-१२०० मिमी/हेक्टर पाण्याची गरज असते. कमी कालावधी : मक्याचे वाढीचे चक्र भातापेक्षा कमी असते. यामुळे शेतकऱ्यांना त्यांची पिके लवकर कापणी आणि विकण्याची सोय होते. उच्च उत्पादन क्षमता : खरीप मक्याचे सरासरी उत्पादन ५०-५५ क्विंटल/हेक्टर आहे. तर भाताचे सरासरी उत्पादन ३५-४० क्विंटल/हेक्टर आहे. कीड व रोगाचा दाब कमी : भातापेक्षा मक्यावर किडीचा प्रादुर्भाव कमी असतो आणि कीड व्यवस्थापनाचा खर्चही कमी असतो. बाजारातील उच्च मागणी आणि किमती : खरीप मका सामान्यतः रब्बी मक्यापूर्वी काढला जातो आणि पुरवठा तुलनेने कमी असताना बाजारात उपलब्ध होतो. त्यामुळे शेतकऱ्यांना चांगला भाव मिळतो. पीक रोटेशनचे फायदे : खरीप मका हे गहू किंवा कडधान्ये यांसारख्या इतर पिकांसोबत आवर्तनाने पीक घेता येते, जमिनीची सुपीकता सुधारते आणि कीड आणि रोगांचा संचय कमी होतो. विविधीकरणाची संधी : खरीप मका पीक विविधीकरणाची संधी देते, ज्यामुळे एकच पीक (उदा. भात) वाढण्याशी संबंधित जोखीम कमी होते.

# संत्रा-मोसंबीची फळगळ होत असल्यास हे उपाय करा

संत्रा आणि मोसंबी बागेत भरपूर फुलधारणा होणे म्हणजे चांगले उत्पादन मिळेलच असे नाही. फुलधारणेनंतर फळधारणा होणे आणि लागलेली फळे काढणीपर्यंत झाडावर टिकून राहणे या दोन्ही बाबी उत्पादनाच्या दृष्टीने महत्त्वाच्या आहेत. प्रत्यक्षात संत्रा-मोसंबी झाडांवर हजारो फुले येतात; मात्र त्यातील बहुतांश फुले आणि सुरुवातीला लागलेली लहान फळे नैसर्गिकरीत्या गळून पडतात. काही प्रमाणातील फळगळ ही झाडाची नैसर्गिक प्रक्रिया असली, तरी त्याचे प्रमाण वाढल्यास अपेक्षित उत्पादन मिळत नाही. बहराच्या काळातील हवामान, जमिनीतील ओलाव्याची स्थिती, पाण्याचे व्यवस्थापन, अन्नद्रव्यांचा पुरवठा, कीड-रोगांचा प्रादुर्भाव आणि वनस्पती वाढ संजीवकांचा योग्य अथवा अयोग्य वापर यांचा फळगळीसह फळांच्या वाढीवर परिणाम होतो.

नैसर्गिक फळगळ : आंबिया बहरामध्ये फेब्रुवारी-मार्च महिन्यात फळधारणा झाल्यावर उष्णतामानात एकदम वाढ होऊन फळे गळतात. शिवाय दिवसाच्या व रात्रीच्या तापमानात या काळात जास्त फरक असल्यामुळे फळांची गळ जास्त होते. संत्रा / मोसंबी झाडावर निसर्गतः आवश्यकतेपेक्षा जास्त फुले येतात. त्यामुळे अन्नद्रव्यांसाठी फुले आणि फळांमध्ये स्पर्धा निर्माण होते. झाडाच्या फळे पोसण्याच्या क्षमतेनुसार तेवढीच फळे झाडावर टिकून राहतात. उर्वरित फळांची गळ होते. त्यामुळे नैसर्गिकरित्या फुलांची व फळांची गळ होत असते.

वातावरणाचा परिणाम :संत्रा/मोसंबीमध्ये तापमान, आर्द्रता आणि वारा या बाबी फळगळीस कारणीभूत ठरतात. मागील काही वर्षांमध्ये एप्रिल महिन्यात तापमानात झालेल्या वाढीमुळे आंबिया बहाराच्या फळांची खूप मोठ्या प्रमाणात गळ होत आहे. तापमानासोबतच हवेतील आर्द्रता सुद्धा फळगळीस कारणीभूत ठरते.

अनियमित पाणीपुरवठा : फळधारणा झाल्यानंतर नियमित सिंचन न केल्यास फळांची गळ होते. आंबिया बहाराची फळे टिकविण्यासाठी सिंचनाचे काटेकोर नियोजन करणे अत्यंत आवश्यक आहे. उन्हाळ्यात पाण्याच्या कमतरतेमुळे फळगळ होण्याची अधिक शक्यता असते. जमिनीत प्रमाणापेक्षा जास्त पाणी असल्यास सुद्धा फळगळ होते.



अयोग्य व्यवस्थापन : बागेत पावसाळ्यात पाणी साचून राहिल्यास फळांची गळ होते. तसेच आवश्यकतेपेक्षा जास्त प्रमाणात आणि चुकीच्या पद्धतीने सिंचन केल्यास फळगळ होण्याची शक्यता असते. बऱ्याच बागांमध्ये साल काढण्यात येत नाही. साल न काढल्यास त्यावर बुरशीची वाढ होऊन ती फळगळीस कारणीभूत ठरते. अशा बागेत फळे काढल्यानंतर फळांची सड लवकर होते.

कीड-रोगांचा प्रादुर्भाव : लिंबूवर्गीय फळबागेत कीड-रोगांच्या प्रादुर्भावामुळे मोठ्या प्रमाणात फळगळ होते. रस शोषण करणाऱ्या पतंगांमुळे आंबिया बहराच्या फळांची ऑगस्ट ते ऑक्टोबर या काळात गळ होते. प्रादुर्भावग्रस्त फळे हाताने दाबून पाहिल्यास त्याला छिद्र पडलेले दिसते . त्यातून रस बाहेर येतो. काही फळे फायटोप्थोरा, कोलोटोट्रीकम, अल्टरनेरीया या बुरशींच्या प्रादुर्भावामुळे गळून पडतात. अल्टरनेरीया बुरशीचा फुलांच्या बिजांडावर प्रादुर्भाव होऊन फळ काढणीच्या अवस्थेत फळगळ होते. अशी फळे कापल्यास फोडीजवळ काळा पट्टा आढळून येतो.

अन्नद्रव्यांची कमतरता : काही बागांमध्ये फळधारणा चांगली झाल्यानंतर सुद्धा फळांची गळ होते. अशावेळी खूप कमी फळे झाडावर राहतात. झाडांची फळधारणा होण्याची क्षमता आणि आलेली फळे टिकवून ठेवण्याची क्षमता या बाबी जमिनीचा मगदूर आणि अन्नद्रव्यांची उपलब्धता यावर अवलंबून असते. जमिनीत चुना व जस्ताचे प्रमाण कमी असल्यास देखील फळगळ होते.

संजीवकांचा अभाव : झाडातील नैसर्गिक संजीवकांचे प्रमाण कमी झाल्यास फळगळ होते. या फळगळीमुळे उत्पादनात मोठ्या प्रमाणावर घट येते. ही फळगळ वेळीच उपाययोजना करून रोखणे अत्यंत आवश्यक असते. अन्यथा उत्पादनात मोठी घट येते. रफळगळ कमी करण्यासाठी उपायः सेंद्रिय व रासायनक खतांची मात्रा शिफारशीप्रमाणे योग्य प्रमाणात व योग्यवेळी द्यावी. नत्राची अर्धी मात्रा अधिक स्फुरद व पालाशची संपूर्ण मात्रा पहिले पाणी देण्याच्या वेळी द्यावी. उरलेली नत्राची अर्धी मात्रा फळे वाटण्याएवढी झाल्यावर द्यावी. खते बांगडी पद्धतीने द्यावीत. शक्यतो खते ठिबक सिंचनाद्वारे द्यावीत. जमिनीचा मगदूर, झाडाचे वय आणि शाखीय वाढ पाहून पाण्याच्या पाळ्यांमध्ये ८ ते १२ दिवसांचे अंतर राखावे. पाण्याची कमतरता असल्यास एक दांड किंवा दुहेरी दांड पद्धतीने किंवा अर्धे आळे पद्धतीने झाडांना पाणी द्यावे. पावसाळ्यात बागेत पाणी साचणार नाही याची काळजी घ्यावी. बागेत साचलेल्या पाण्याचा निचरा होण्याची व्यवस्था करावी. मुख्यतः ऑगस्ट-सप्टेबर महिन्यात बागेत पाणी साचून राहिल्यास व पाण्याचा निचरा न झाल्यास फळांची गळ अधिक होते. बागेत पाणी साचू नये यासाठी दोन किंवा तीन ओळीत एक याप्रमाणे बागेच्या उताराच्या दिशेने उथळ चर काढून पाणी बागेच्या बाहेर काढावे. बागेभोवती दक्षिण व पश्चिम दिशेने शेवरी सारख्या वारा प्रतिबंधक झाडांची लागवड करावी. झाडावरील सल नियमित काढून बुरशीनाशकाची फवारणी करावी. आंबिया बहरातील फळांची प्रथमावस्थेत आणि ऑगस्ट ते ऑक्टोबर या काळात होणारी फळगळ कमी करण्यासाठी प्रत्येक महिन्यात नॅप्थिल ॲसिटिक ॲसिड (एन.ए.ए.) (१० पीपीएम) १ ग्रॅम अधिक युरिया (१ टक्का) १ किलो प्रति १०० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. पावसाळ्यात ही फवारणी करताना द्रावणात कार्बेन्डाझिम १ ग्रॅम प्रति लिटर पाणी या प्रमाणात मिसळावे.

रसशोषक पतंग : आंबिया बहाराच्या फळातील रस शोषणाऱ्या पतंगाचा प्रादुर्भाव सप्टेंबर-ऑक्टोबर महिन्यात आढळतो. यासाठी बागेच्या परिसरातील गुळवेल, वासनवेल, चांदवेल इत्यादी तणांचा नाश करावा. तसेच बागेत रात्री धूर केल्यास पतंगाचा प्रादुर्भाव कमी होतो. बागेत खाली गळून पडलेली फळे दररोज गोळा करून खड्ड्यात पुरून टाकावीत. पसरट भांड्यात गुळाचे पाणी अधिक संत्र्याचा रस अधिक कोणतेही आंतर प्रवाही कीटकनाशकाचे द्रावण तयार करून हे भांडे झाडावर लटकविल्यास पतंगाचा प्रादुर्भाव कमी होतो. प्रतिबंधात्मक उपाय म्हणून निंबोळी अर्क (५ टक्के) ५० ग्रॅम किंवा निमतेल १० मिलि प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१६७४ : शिवाजी महाराजांनी इंग्रजांशी मित्रत्त्वाचा तह केला.
१७९९ : रणजितसिंग यांनी लाहोर ताब्यात घेतले व ते पंजाबचे सम्राट झाले.
१९२० : पनामा कालव्याचे औपचारिक उद्घाटन झाले. पण याआधीच ६ वर्षे तो वाहतुकीस खुला झाला होता.
१९३५ : आषाढ शुद्ध एकादशी आषाढी एकादशी 'प्रभात'चा 'चन्द्रसेना' हा मराठी चित्रपट मुंबईच्या 'मिनर्व्हा' चित्रपटगृहात प्रदर्शित झाला. अनेक ट्रिकसीन्स असलेला हा चित्रपट याच नावाच्या मूकपटावर बेतलेला होता.
१९६० : राज्यातील भागलपूर आणि रांची विद्यापीठाची स्थापना करण्यात आली.
१९६१ : मुठा नदीच्या आंबी या उपनदीवरील पानशेत व खडकवासला ही धरणे फुटल्यामुळे पुण्यात आलेल्या पुरात सुमारे २,००० लोक मृत्यूमुखी पडले तर १,००,००० लोक विस्थापित झाले.
१९६२ : लंडनमधील मार्की क्लबमधे 'द रोलिंग स्टोन्स' चा पहिला कार्यक्रम झाला.
१९७९ : किरिबातीला (इंग्लंडपासुन) स्वातंत्र्य मिळाले.
१९८२ : राष्ट्रीय कृषी आणि ग्रामीण विकास बँकेची स्थापना
१९८५ : पी. एन. भगवती यांनी भारताचे १७ वे सरन्यायाधीश म्हणुन कार्यभार सांभाळला.
१९९५ : अभिनेते दिलीपकुमार यांना 'दादासाहेब फाळके पुरस्कार' जाहीर
१९९८ : १६ व्या विश्वकरंडक फुटबॉल स्पर्धेत यजमान फ्रान्सने गतविजेत्या ब्राझिलचा ३-० असा पराभव करुन विश्वकरंडक जिंकला.
१९९९ : 'महाराष्ट्र भूषण' हा राज्याचा सर्वोच्च पुरस्कार सुनील गावसकर यांना प्रदान करण्यात आला.
२००१ : कृषीशास्त्रज्ञ डॉ. एम. एस. स्वामीनाथन यांना 'टिळक पुरस्कार' जाहीर

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१०० : १०० ई .पूर्व : रोमन सम्राट ज्यूलियस सीझर यांचा जन्म.
१८१७ : हेन्री थोरो अमेरिकन लेखक व विचारवंत (मृत्यू: ६ मे १८६२)
खिस्त पूर्व १००: ज्यूलियस सीझर रोमन सम्राट (मृत्यू: ख्रिस्त पूर्व ४२)
१८५२ : अर्जेन्टीनाचे राष्ट्राध्यक्ष हिपोलितो ग्रिगोयेन यांचा जन्म.
१८५४ : जॉर्ज इस्टमन अमेरिकन संशोधक व इस्टमन कोडॅक कंपनीचे संस्थापक (मृत्यू: १४ मार्च १९३२)
१८६३ : वि. का. राजवाडे इतिहासाचार्य (मृत्यू: ३१ डिसेंबर १९२६)
१८६४ : जॉर्ज वॉशिंग्टन कार्व्हर अमेरिकन वनस्पतीतज्ञ, शिक्षणतज्ञ, संशोधक आणि शास्त्रज्ञ (मृत्यू: ५ जानेवारी १९४३)
१९०९ : बिमल रॉय प्रथितयश दिग्दर्शक (मृत्यू: ८ जानेवारी १९६६)
१९१३ : इंग्रजी लेखक मनोहर माळगावकर यांचा जन्म. (मृत्यू: १४ जून २०१०)
१९२० : यशवंत विष्णू चंद्रचूड सर्वोच्च न्यायालयाचे १६ वे सरन्यायाधीश (मृत्यू: १४ जुलै २००८)
१९४७ : भारतीय क्रिकेट खेळाडू पूचिया कृष्णमूर्ती यांचा जन्म.
१९६१ : भारतीय अभिनेते, गायक आणि निर्माते शिव राजकुमार यांचा जन्म.
१९६५ : संजय मांजरेकर भारतीय क्रिकेट भाष्यकार आणि माजी यष्टिरक्षक क्रिकेटपटू
१९८२ : अर्जुन पुरस्कार विजेता महिला टेबल टेनिसपटू अचंत शरत कमल यांचा जन्मदिन.
१९९७ : युवा नोबल पारितोषिक विजेता पाकिस्तानी स्त्रीवादी शैक्षणिक कार्यकर्त्या महिला मलाला यूसुफजई यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१४८९ : दिल्ली येथील लोदी वंशाचे संस्थापक व शासक बहलूल खान लोदी यांचे निधन.
१६६० : बाजी प्रभू देशपांडे (जन्म: ? ? १६१५)
१६६५ : अलेक्झांडर कार्टराईट बेसबॉलचे जनक (जन्म: १७ एप्रिल १८२०)
१९१० : रॉल्स-रॉयस लिमिटेड चे सहसंस्थापक चार्ल्स रोलस्? यांचे निधन. (जन्म: २७ ऑगस्ट १८७७)
१९४९ : आयर्लंड चे पहिले राष्ट्राध्यक्ष डग्लस हाइड यांचे निधन.
१९९४ : हिंदी व मराठी चित्रपटसृष्टीचा चालताबोलता इतिहास मानले जाणारे पटकथाकार व 'बॉम्बे पब्लिसिटी सर्व्हिस'चे वसंत साठे (आवारा, श्री ४२०, मेरा नाम जोकर, डॉ. कोटणीसकी अमर कहानी, राम तेरी गंगा मैली) (जन्म: )
१९९९ : राजेंद्रकुमार हिन्दी चित्रपट अभिनेता (जन्म: २० जुलै १९२९)
२००० : मराठी कवयित्री इंदिरा संत यांचे निधन.
२००१ : देवांग मेहता तंत्रज्ञान अग्रणी (जन्म: १० ऑगस्ट १९६०)
२०१२ : दारा सिंग मुष्टीयोद्धा आणि अभिनेता (जन्म: १९ नोव्हेंबर १९२८)
२०१३ : प्राण कृष्ण सिकंद ऊर्फ 'प्राण' चित्रपट अभिनेता (जन्म: १२ फेब्रुवारी १९२०)
२०१३ : बोस कॉर्पोरेशन चे स्थापक अमर बोस यांचे निधन. (जन्म: २ नोव्हेंबर १९२९)



बुधवार दि.१२ ऑगस्ट २०२६ | ५

राज्य लोकतंत्र

मराठवाडा वृत्तांत



# वडिलांचे प्रेम आणि आपल्या सर्वांच्या बळावरच जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या चेअरमनपदाची जबाबदारी मिळाली-राहुल लोणीकर

जालना। प्रतिनिधी

जालना जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या अध्यक्षपदी राहुल लोणीकर यांची निवड झाल्याबद्दल परतूर येथे त्यांचा भव्य नागरी सत्कार सोहळा उत्साहात संपन्न झाला. राहुल लोणीकर यांच्या निवडीबद्दल अभिनंदन करण्यासाठी परतूर विधानसभा मतदारसंघासह जालना जिल्हा आणि संपूर्ण मराठवाड्यातील विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. राहुल लोणीकर यांच्या निवडीमुळे परतूर विधानसभा मतदारसंघाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला असल्याची भावना यावेळी उपस्थितांनी व्यक्त केली. राजकीय, सामाजिक, सहकार, शैक्षणिक, व्यापारी तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी राहुल लोणीकर यांचा सत्कार करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.



स्नेह निवास परतूर येथे संपन्न झालेल्या सत्कार समारंभ प्रसंगी बोलताना आमदार बबनराव लोणीकर म्हणाले की, ''जालना जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक ही शेतकरी आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची संस्था आहे. या बँकेला सुस्थितीत आणण्याची मोठी जबाबदारी आता राहुल लोणीकर यांच्या खांद्यावर आली आहे. ही जबाबदारी ते निश्चितपणे सक्षमपणे पार पाडतील.राहुल लोणीकर यांच्या पाठीशी सर्व नेतेमंडळी ठामपणे उभी आहेत. बँकेच्या प्रगतीसाठी आणि शेतकरी व सभासदांच्या हितासाठी आवश्यक ते सर्व सहकार्य केले जाईल, अशी ग्वाहीही आमदार बबनराव लोणीकर यांनी यावेळी दिली. बँकेच्या माध्यमातून शेतकरी, सभासद आणि ग्रामीण भागातील नागरिकांना अधिक चांगल्या सुविधा मिळाव्यात, बँकेचा कारभार अधिक सक्षम व्हावा आणि सहकार क्षेत्राला नवी दिशा मिळावी, यासाठी राहुल लोणीकर निश्चितच प्रयत्न करतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या वेळी राहुल लोणीकर नागरी सत्काराला उत्तर देताना उपस्थितांचे मनःपूर्वक आभार मानले. ते म्हणाले, ''माझे वडील आमदार बबनराव लोणीकर यांचे प्रेम, मार्गदर्शन आणि आशीर्वाद तसेच आपण सर्वांनी दिलेले प्रेम, विश्वास आणि बळ यामुळेच मला आज जालना जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या चेअरमनपदाची जबाबदारी मिळाली आहे. असे सांगतानाच राहुल लोणीकर म्हणाले की आमदार बबनराव लोणीकर हे माझ्यासाठी चालते बोलते विद्यापीठ असून या विद्यापीठातूनच मी राजकीय जीवनामध्ये पंचायत समितीचा सभापती , जिल्हा परिषदेचा उपाध्यक्ष, युवा मोर्चा चा उपाध्यक्ष, सरचिटणीस आणि महाराष्ट्र युवा मोर्चाचा प्रदेशाध्यक्ष त्यानंतर भाजपा प्रदेश सचिव होऊ शकलो आता माझ्या खांद्यावर पक्षाच्या सहसंयोजक पदाची जबाबदारी असून हे केवळ माझ्या वडिलांमुळे व आपल्या सर्वांच्या पाठिंबामुळे शक्य होऊ शकले असेही यावेळी बोलताना त्यांनी नमूद केले. मिळालेले पद ही केवळ प्रतिष्ठेची बाब नसून मोठी जबाबदारी असल्याचे सांगत राहुल लोणीकर म्हणाले की, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला उत्तम स्थितीत आणण्यासाठी आपण सर्वांना सोबत घेऊन काम करू. शेतकरी, सभासद आणि सर्वसामान्य नागरिकांच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य देत बँकेच्या विकासासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न करणार असल्याचे यावेळी राहुल लोणीकर यांनी स्पष्ट केले. जिल्हा व मराठवाड्यातून मान्यवरांची उपस्थिती या भव्य नागरी सत्कार सोहळ्यास परतूर विधानसभा मतदारसंघातील विविध गावांमधून पदाधिकारी, कार्यकर्ते, शेतकरी, व्यापारी, नागरिक तसेच विविध संस्थांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्याचबरोबर जालना जिल्हा आणि मराठवाड्यातील विविध भागांतून आलेल्या मान्यवरांनी राहुल लोणीकर यांचे अभिनंदन केले.विविध सामाजिक संस्था, सहकारी संस्था, व्यापारी संघटना, शेतकरी प्रतिनिधी आणि नागरिकांच्या वतीने राहुल लोणीकर यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी शत्रुघन कणसे संपत टकले रमेश भापकर, प्रवीण सातोनकर पांडुरंग वहिले संभाजी वारे रवींद्र सोळंके अशोकराव बरकुले तुकाराम सोळंके शहाजी राक्षे, नितीन जोगदंड परतुर कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक लक्ष्मणराव टेकाळे,पाराजी मुळे आप्पासाहेब खोसे पंजाबराव अवचार सत्यनारायण अग्रवाल नगरसेवक प्रकाश चव्हाण, संदीप बाहेकर, सोनू अग्रवाल सतीश सोनवणे इजरान कुरेशी सावता काळे कृष्णा आरगडे भगवानराव मोरे ओम प्रकाश मोर दया काटे ज्ञानेश्वर यांच्यासह परतूर शहरासह ग्रामीण भागातील असंख्य कार्यकर्त्यांनी जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष राहुल लोणीकर यांचा सत्कार केला

## संघटन मजबूत करण्यासाठी शिवसेना कार्यकर्त्यांना निश्चित बळ देणार : राज्यमंत्री आशिष जैस्वाल

जालना। प्रतिनिधी

बदनापूर तालुक्यासह संपूर्ण जालना जिल्ह्यात शिवसेनेची संघटनात्मक बांधणी अधिक मजबूत करण्यासाठी तळागाळातील कार्यकर्त्यांना निश्चित बळ दिले जाईल. गाव, वाडी-वस्तीपासून बूथ पातळीपर्यंत संघटना सक्षम करण्यासाठी पदाधिकाऱ्यांनी जनतेच्या प्रश्नांमध्ये सक्रिय सहभाग नोंदवून सातत्याने जनसंपर्क वाढवावा, असे आवाहन राज्याचे राज्यमंत्री तथा जालना जिल्ह्याचे संपर्कमंत्री आशिष जैस्वाल यांनी केले. बदनापूर विधानसभा मतदारसंघातील शिवसेना पदाधिकाऱ्यांची संवाद व आढावा बैठक बदनापूर येथील शिवसेना जनसंपर्क कार्यालयात उत्साहात पार पडली. यावेळी राज्यमंत्री तथा जालना जिल्ह्याचे संपर्कमंत्री आशिष जैस्वाल, शिवसेना संपर्कप्रमुख भास्करराव अंबेकर, पंडितराव भुतेकर, शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे, संपर्कप्रमुख ए. जे. बोराडे यांच्यासह शिवसेना, युवासेना व विविध आघाड्यांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




यावेळी मार्गदर्शन करताना आशिष जैस्वाल म्हणाले की, प्रत्येक पदाधिकाऱ्याने आपल्या कार्यक्षेत्रात पक्षाची भूमिका तसेच शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचवावी. केवळ निवडणुकीपुरता जनसंपर्क मर्यादित न ठेवता वर्षभर जनतेच्या संपर्कात राहून त्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी प्रयत्न करावेत. तळागाळातील कार्यकर्त्यांच्या मेहनतीमुळेच पक्षाची संघटना मजबूत होत असते. त्यामुळे कार्यकर्त्यांमध्ये समन्वय वाढवून संघटन विस्तारण्यावर भर द्यावा, असे त्यांनी सांगितले. ''शिवसेना कार्यकर्त्यांच्या पाठीशी वरिष्ठ नेतृत्व ठामपणे उभे राहील. कार्यकर्त्यांना आवश्यक ते बळ देण्यासाठी आपण निश्चितपणे पुढाकार घेऊ,'' अशी ग्वाहीही जैस्वाल यांनी दिली. तसेच ''तूच आहेस तुझ्या भविष्याचा शिल्पकार'' हा प्रेरणादायी मंत्र देत कार्यकर्त्यांनी आत्मविश्वासाने संघटनात्मक कामाला लागण्याचे आवाहन त्यांनी केले. बैठकीच्या प्रास्ताविकात शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे यांनी जालना जिल्ह्यात शिवसेनेची संघटनात्मक ताकद दिवसेंदिवस वाढत असल्याचे सांगितले. जिल्ह्यात पक्षाचे संघटन विस्तारत असून कार्यकर्त्यांमध्ये मोठा उत्साह आहे. मात्र, महायुतीच्या माध्यमातून आपण सत्तेत असताना विकासकामे व शासकीय योजनांच्या बाबतीत मित्रपक्षांतील काही लोकप्रतिनिधींकडून शिवसेना कार्यकर्त्यांना दुजाभावाची वागणूक मिळत असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. शिवसेनेच्या वाढीसाठी कार्यकर्त्यांनी सातत्याने मेहनत घेतली आहे. त्यामुळे विकासकामे, शासकीय योजना आणि स्थानिक प्रश्नांच्या बाबतीत शिवसेना कार्यकर्त्यांना योग्य स्थान व सन्मान मिळणे आवश्यक आहे. वरिष्ठ नेतृत्वाने कार्यकर्त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहून त्यांना बळ द्यावे, अशी अपेक्षा घुगे यांनी व्यक्त केली. बैठकीत विविध पदाधिकाऱ्यांनी आपापल्या कार्यक्षेत्रातील संघटनात्मक परिस्थितीचा आढावा मांडला. आगामी काळात बूथनिहाय संघटन मजबूत करणे, नव्या कार्यकर्त्यांना पक्षाच्या प्रवाहात आणणे, जनतेच्या प्रश्नांवर प्रभावीपणे आवाज उठविणे तसेच शासनाच्या योजनांचा लाभ पात्र नागरिकांपर्यंत पोहोचविणे, यावर विशेष भर देण्यात आला. यावेळी काकासाहेब महाराज खैरे, सुभाषराव बोडखे, युवासेना लोकसभा अध्यक्ष गणेश मोहिते, युवा सेना जिल्हाध्यक्ष अमोल ठाकूर, अजय कदम, शेख जावेद, कैलास दुधानी, भास्करराव मगरे, कालींदाताई ढगे, छायाताई जराड, ईश्वर पाटील जुंबड, महादू गीते, नंदूभाऊ दाभाडे, कैलास चव्हाण, राजेंद्र चौधरी, कैलास वैद्य, दीपक दिघे, मनोज शिंदे, रामेश्वर नागवे, निवृत्ती डाके, सिताराम गोरे, रतनकुमार नाईक, हरिभाऊ कापसे, सखाराम शिरसागर, सय्यद इमरान, संभाजी गोरे, महेश रायकर, शिवाजी इंगळे, रुद्र घोगे, अनिल हिवराळे, अमोल दाभाडे, ऋषिकेश थोरात, राऊत पटेल, रामेश्वर नारायण ब्राह्मणे, भगवान ढाकणे, भगवान सावंत, जना बापू कोलते, राजू पाटील वायाळ, बाबासाहेब चंद, देवा ढाकणे, शेख मुनीर, सतीश चव्हाण, महेश सातपुते, दीपक खरात, रामेश्वर दराडे, विलास तुपे, गणपत केकान, विजय कठाळे यांच्यासह शिवसेना, युवासेना व विविध आघाड्यांचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## थकीत कर्जदार शेतकऱ्यांना मोठा दिलासा

### जिल्हा मध्यवर्ती बँकेस ६.५५ कोटींची कर्जमाफीची रक्कम प्राप्त-राहुल लोणीकर

जालना। प्रतिनिधी

महाराष्ट्रातील थकीत कर्जदार शेतकऱ्यांना कर्जाच्या ओझ्यातून मुक्त करण्यासाठी राज्य शासनाच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेअंतर्गत जालना जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेस ₹६ कोटी ५५ लाख ४६ हजारांची कर्जमाफीची रक्कम प्राप्त झाली असल्याची माहिती प्रसिद्धी पत्रकाद्वारे बँकेचे अध्यक्ष राहुल लोणीकर यांनी दिली आहे या रकमेचा थेट लाभ जिल्ह्यातील २,२१० थकीत कर्जदार शेतकऱ्यांना मिळाला असून, संबंधित शेतकऱ्यांची खाती जमा करून त्यांना कर्जमुक्त करण्यात आले असल्याचे त्यांनी या पत्रकात नमूद केले आहे. जालना जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने महाराष्ट्र शासनाच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेच्या पोर्टलवर जिल्ह्यातील १९,६६८ थकीत कर्जदार शेतकऱ्यांचा डेटा अपलोड केला आहे. या थकीत शेतकऱ्यांना कर्जमुक्त करण्यासाठी शासनाकडून बँकेस थकीत मुद्दलाचे ₹३६ कोटी आणि थकीत व्याजापोटी ₹११ कोटी, अशी एकूण ₹४७ कोटींची कर्जमाफीची रक्कम प्राप्त होणार आहे.



दरम्यान, दि. ३ ऑगस्ट २०२६ रोजी बँकेस २,२१० थकीत कर्जदार शेतकऱ्यांसाठी ₹६ कोटी ५५ लाख ४६ हजारांची रक्कम प्राप्त झाली होती. प्राप्त झालेली संपूर्ण रक्कम संबंधित थकीत कर्जदार शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करून त्यांना कर्जमुक्त करण्यात आले आहे. त्यामुळे अनेक वर्षांपासून कर्जाच्या ओझ्याखाली असलेल्या शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. जालना जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक शेतकऱ्यांना शासकीय योजनांचा लाभ तातडीने मिळवून देण्यासाठी अग्रेसर असून, वर्षानुवर्षे थकीत कर्जाच्या गर्तेत अडकलेल्या शेतकऱ्यांना महाराष्ट्र शासनाच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेद्वारे थकीत कर्जातून संपूर्ण मुक्त करून त्यांना नियमित पीक कर्जाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी बँक प्रयत्नशील आहे. शेतकरी हा जिल्ह्याच्या अर्थव्यवस्थेचा केंद्रबिंदू असून, त्याला आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे आणि त्याच्या शेतीला पुन्हा चालना देणे आवश्यक आहे. जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी आपली अमूल्य ठेव जिल्हा बँकेत ठेवून जिल्ह्याच्या विकासाला हातभार लावावा, असे आवाहन जालना जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष राहुल लोणीकर यांनी केले आहे. या कर्जमाफीमुळे थकीत कर्जदार शेतकऱ्यांना नव्याने पीक कर्ज घेण्याचा मार्ग मोकळा होऊन शेतीच्या पुढील हंगामासाठी आर्थिक आधार मिळण्याची अपेक्षा आहे.

## चार न्यायाधीशांच्या बदल्या होऊन आज नवीन न्यायाधीश रुजू

जालना। प्रतिनिधी

जालना तालुका न्यायालयातुन तीन व बदनापूर तालुका न्यायालयातुन येथुन एक अशा चार न्यायाधीशांची जालना जिल्ह्यांतर्गत बदल्या झाल्या असून आज दि.१० ऑगस्ट २०२६, सोमवार रोजी रुजू होऊन त्यांनी न्यायालयीन कामकाजास सुरुवात केली आहे.जालना तालुका दिवाणी व फौजदारी न्यायालयातुन श्रीमती रुहिना अंजुम मो.युनूस यांची मंठा तालुका न्यायालयात,श्रीमती पी.व्ही.शिंदे,श्रीमती एम.व्हि.कदम यांची बदनापूर तालुका न्यायालयात,बदनापूर तालुका न्यायालयातील जी.एन.लंघे यांची जाफराबाद तालुका न्यायालयात बदली झाली आहे,चारही न्यायाधीशांनी पदस्थापनेच्या ठिकाणी जाऊन तथा रुजू होऊन पदभार स्वीकारल्यानंतर न्यायालयीन कामकाजास सुरुवात केली आहे अशी माहिती ॲड.अरविंद एस.मुरमे यांनी दिली आहे

## करोडपतीच्या मंचावर माधुरींची एंट्री!

बीड। प्रतिनिधी

मराठी मनोरंजनविश्वातील लोकप्रिय ज्ञानाधारित कार्यक्रम 'कोण होणार करोडपती' नव्या पर्वासह प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. सोनी मराठी वाहिनी आणि सोनी लाईव्हकडून या नव्या पर्वाची घोषणा करण्यात आली असून, यावेळी महाराष्ट्राची लाडकी अभिनेत्री आणि पद्मश्री पुरस्काराने सन्मानित माधुरी दीक्षित सूत्रसंचालिकेच्या भूमिकेत दिसणार आहेत.माधुरी दीक्षित यांच्या आगमनामुळे 'कोण होणार करोडपती'च्या मंचावर नवी ऊर्जा, नवा अंदाज आणि वेगळा उत्साह पाहायला मिळणार आहे. गेली अनेक दशके आपल्या अभिनय आणि नृत्याने प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवणाऱ्या माधुरी दीक्षित आता स्पर्धकांच्या ज्ञानाची आणि जिद्दीची परीक्षा घेणार आहेत.ज्ञानाच्या बळावर स्वप्नांना नवी दिशा देणारा आणि सामान्य माणसाच्या असामान्य प्रवासाला व्यासपीठ देणारा हा कार्यक्रम यंदाही प्रेरणादायी ठरणार आहे. 'एका संधीमुळे आयुष्य बदलू शकते' या विश्वासावर आधारित या कार्यक्रमातून स्पर्धकांना आपल्या ज्ञानाच्या जोरावर मोठे स्वप्न पूर्ण करण्याची संधी मिळणार आहे.या नव्या पर्वाबद्दल माधुरी दीक्षित यांनी आनंद व्यक्त करताना, 'कोण होणार करोडपती' हा केवळ कार्यक्रम नसून महाराष्ट्रातील लाखो कुटुंबांच्या आशा, स्वप्ने आणि ज्ञानावरील विश्वासाचा उत्सव असल्याचे म्हटले. स्पर्धकांच्या संघर्षाचा आणि स्वप्नांचा प्रवास जवळून अनुभवण्याची संधी मिळत असल्याचा आनंदही त्यांनी व्यक्त केला. 'आता खेळ बदलणार!' या नव्या घोषवाक्यासह 'कोण होणार करोडपती' लवकरच फक्त सोनी मराठी आणि सोनी लाईव्ह वर प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

**जाहीर प्रगटन**

**मा. श्रीमती एस. आर. पाटील, सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, पाटोदा, ता. पाटोदा, जि. बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज २६६/२०२६**

**मार्फत ॲड. एस. आर. नागरगोजे**

**उध्दव व इतर विरुध्द निरंक**

अर्जदार :- १. उध्दव कुंडलिक पवळ, रा. चुबंळी ता. पाटोदा जि. बीड. २. सत्यभामा कुंडलिक पवळ, रा. चुबंळी ता. पाटोदा जि. बीड. ३. गंगुबाई विष्णु काशिद, रा. नवगण राजुरी ता. जि. बीड.

विरूध्द कोणीही नाही

मागणी अर्ज:- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत..

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत कुंडलिक दगडु पवळ, हे रा. मौजे चुबंळी ता. पाटोदा जि. बीड. यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे. ज्याअर्थी कुंडलिक दगडु पवळ, यांचा मृत्यु दिनांक १३/११/२०२५ रोजी चुबंळी ता. पाटोदा जि. बीड, येथे मयत झालेले आहेत. तसेच मयताचे आई वडील यापुर्वीच मयत झालेले आहेत. अर्जदार कं. १ हा मयताचा मुलगा असुन अर्जदार कं. २ ही मयताची पत्नी आहे तसेच अर्जदार कं. ३ ही मयताची विवाहित मुलगी आहे.

वरील अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामाकरीता व इतर कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत अथवा त्यांच्या व्यतिरीक्त इतर कोणी मयताचे वारस आहेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर या जाहिरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत कुंडलिक दगडु पवळ, यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी. आज दिनांक ११ ऑगस्ट २०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले. सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. २१ सप्टेंबर २०२६.

स्वाक्षरित
क. लिपीक

**आदेशावरुन,**
स्वाक्षरित
**सहाय्यक अधिक्षक,**
**दिवाणी न्यायालय, क. स्तर, पाटोदा.**
**ता. पाटोदा, जि. बीड.**

## हमीभाव, पिक विमा, अतिवृष्टी अनुदान द्या, भारत अमेरिका मुक्त व्यापार करार रद्द करा- प्रा. सुशीला मोराळे

नांदुरघाट । प्रतिनिधी

२०१४ च्या लोकसभा निवडणूक जाहीरनाम्यात शेतकऱ्याला उत्पादन खर्चावर आधारित हमीभाव अधिक ५० % नफा इतका भाव देऊ असे वचन मोदीजींच्या सरकारने दिले होते. परंतु आता १२ वर्ष सरकारला काम करण्याची संधी शेतकरी, कामगारांनी दिली मात्र सरकारने दिलेला शब्द पाळला नाही, २०२५ ला महाराष्ट्रात बीडसह नऊ जिल्ह्यात अतिवृष्टी झाली २६ एप्रिल २०२६ ला बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी ३ कोटी ६ हजार इतकी तरतूद केल्याचा जीआरही सरकारने काढला महाराष्ट्रात ६६ हजार शेतकरी बाधित झाले. त्यांच्या जमिनीतील माती वाहून गेली प्रचंड नुकसान झाले मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांनी हेलिकॉप्टरने पाहणी केली १७५०० रुपये पिक विमा हेक्टरी दिला जाईल असे आश्वासन दिले अजूनही शेतकरी विम्याची वाट बघत आहेत शेतकऱ्यांना पूर्णपणे उध्वस्त करून त्यांची शेती अदानी, अंबानी या कार्पोरेटना देण्याचा प्रयत्न सुरू आहे. मोदी सरकार भारत अमेरिका मुक्त व्यापार सुरू करून शेतकऱ्याला उध्वस्त करू पाहत आहे. सोयाबीन मकासह अन्य शेतीमाल अमेरिकेकडून भारत खरेदी करणार आहे इथला शेतकरी वेठबिगार झाला पाहिजे. म्हणून पीएम किसान योजनेअंतर्गत वर्षाला ६ हजार रुपये देऊन त्याला लाचार बनवणे सुरू आहे. या सर्व शेतकरी कामगार धोरणाच्या विरोधात संयुक्त किसान मोर्चा नवी दिल्ली आणि किसान संघर्ष समितीच्या वतीने बीड तालुक्यातील नांदूर फाटा येथे शेतकऱ्यांचा भव्य रस्ता रोको प्रा. सुशीलाताई मोराळे, प्रकाश भन्साळी सह शेकडो शेतकऱ्यांच्या उपस्थित संपन्न झाला. मोठ्या संख्येने शेतकरी, शेतमजूर, कामगार, कष्टकरी या रस्ता रोकोत हजर होते.




आजही ६० टक्के ग्रामीण भागात शेती व्यवसाय करतात. शेतमजुरांना बारा बलुतेदारांना जगवतात. सर्वात मोठा रोजगार देणारे क्षेत्र शेती आहे परंतु पूर्णपणे दुर्लक्षित आहे. मनमोहन सिंग सरकारचे मनेरगा योजना भाजपा सरकारने मोडीत काढली आहे. कामगाराच्या विरोधात ४ कायदे पारित करून त्यांना देशोधडीला लावले आहे. विकासाच्या नावाखाली रस्ते उभे करण्यासाठी हजारो एकर जमीन ताब्यात घेऊन शेतीतून हुसकावून लावुन त्यांना स्थलांतर करण्यास सरकार भाग पाडीत आहे. आता कुठे शेतकऱ्याची लेकरं शिकायला लागली होती हे शिक्षणच संपविले जात आहे. देशात ९२ हजार शाळा बंद केल्या असा अहवाल निती आयोगाने प्रसिद्ध केला आहे. राज्यात प्रत्येक महिन्याला ३५ शेतकरी आत्महत्या करीत आहेत. तात्पुरती मलमपट्टी कर्जमाफी जाहीर करून केली जात आहे. ही कर्जमाफी कागदोपत्रीच असते. के.वाय.सी. केल्याशिवाय मिळत नाही. खते बी बियाणे कीटकनाशके यावर १८% जीएसटी आकारली जात आहे. ही जी एस टी रद्द केली पाहिजे.

जे शेतकरी कर्ज भरतात त्यांना प्रोत्साहन अनुदान सरकार जाहीर करते हे अनुदान २ लाख रुपये दिले पाहिजे. पूर्ण क्षमतेने १२ तास दिवसा लाईट शेतकऱ्यांना द्या. दुबार पेरणीसाठी १० हजार रुपये एकरी द्या यासह सर्व मागण्या मान्य करून घेण्यासाठी सरकारचे लक्ष वेधण्यासाठी रस्ता रोको करण्यात आला असल्याचे प्रा. सुशीलाताई मोराळे म्हणाल्या, याप्रसंगी माजी आमदार जनार्दन तात्या तुपे, प्रकाश भन्साळी, डॉ. सुशील वैद्य, आर डी जाधव, प्रेमचंद कोकाटे, सुधाकर उगलमुगले, जयराम चौरे, मारुती मुंडे, मधुकर पंडित, उमेश वाघ, श्रीकांत चौरे, राजेंद्र दराडे, राहुल हंगे, उत्तम तारळकर, विलास केदार, तुकाराम तांबडे, गणेश मुंडे, लक्ष्मण ढाकणे, बबन आंधळे, अशोक मोराळे. भास्कर दराडे, अंकुश वाघ, पांडुरंग चांगन, सतीश शिंदे,तुकाराम तांबडे, सुरेश हंगे,बळीराम हंगे, सुदाम उगलमुगले, सुभाष चौरे, आत्माराम उगलमुगले, लहू उगलमुगले, बाळू सारूक, अर्जुन करडकर, राजाभाऊ हांडगे, अनिल पाटील, श्रीधर जाधव, संजीवनी इंगोले, रसूल पठाण, तसूर पठाण, रफिक पठाण, आत्माराम परदेशी, राम आंधळे, अशोक मोराळे, बबन मोराळे, केशव किशोर तांदळे, बालु मोराळे, मोहन जाधव, पत्रकार श्रीकांत जाधव, अर्जुन गायकवाड, दया गायकवाड, सटवा सांगळे, बाबुराव मोराळे, कृष्ण पवार, अशोक पवार, अर्जुन पवार, सतीश सोळुंके, अक्षय सोळुंके, राम पवार, बालू बिकड, विलास केदार, केशव केदार, राम केदार, प्रदीप दराडे, नामदेव ढाकणे, वसंत मोराळे, अश्रुबा मोराळे, रामदास हंगे, इत्यादी मान्यवर हजर होते.

# तुकाराम मुंडे यांच्या प्रशासकीय प्रवासातून प्रामाणिक सेवेची प्रेरणा नागरिकांची सजग भूमिका महत्त्वाची : ज्येष्ठ पत्रकार संजय आवटे

## बीडमध्ये 'तुकाराम' ग्रंथाचे लोकार्पण

बीड । प्रतिनिधी

प्रामाणिक अधिकारी अथवा निर्भीड पत्रकार हे अपवाद वाटावेत, हे सामाजिक अपयश आहे. समाजाच्या प्रगतीसाठी नागरिकांनी सजग आणि सक्रिय भूमिका बजावली, तर तुकाराम मुंडे यांच्यासारखे सनदी अधिकारी एकाकी राहणार नाहीत, असे मत संपादक, लेखक व वक्ते संजय आवटे यांनी व्यक्त केले.

तुकाराम मुंडे यांच्या जीवनप्रवासावर आधारित 'तुकाराम' या ग्रंथाचा लोकार्पण सोहळा बीड येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहाच्या सभागृहात झाला. यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी सनदी अधिकारी अशोकराव मुंडे होते. प्रमुख उपस्थिती म्हणून ज्येष्ठ पत्रकार व लेखक शफी पठाण, बिंदुसरा सांस्कृतिक सामाजिक प्रतिष्ठानचे अध्यक्ष महादेव धांडे, उपाध्यक्ष सुनील माने, सचिव प्राचार्य दिनकर तेलप, डॉ. बळीराम गवते, इंजि. गोविंद कदम, ड. जयंत राख, पत्रकार रवि उबाळे आणि सी. आर. पटेल उपस्थित होते.

लेखक व वक्ते संजय आवटे यांनी तुकाराम मुंडे यांच्या कार्याचा गौरव करताना नियमांनुसार आणि प्रामाणिकपणे काम करणाऱ्या



अधिकाऱ्यांमुळे प्रशासनाविषयी नागरिकांचा विश्वास अधिक दृढ होतो, असे सांगितले. सार्वजनिक पदावर काम करताना पारदर्शकता, जबाबदारी आणि नागरिकांच्या हिताला प्राधान्य देणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

तुकाराम मुंडे यांच्या प्रशासकीय प्रवासात आलेली विविध आव्हाने आणि त्यांनी घेतलेले निर्णय यांचा अभ्यास नव्या पिढीसाठी उपयुक्त ठरू शकतो. मुंडे आयएएस झाले म्हणून सर्वांनी त्याच वाटेने जावे असे नाही.



प्रत्येकाने आपली वाट ठरवावी. मात्र, 'आम्ही भारताचे लोक' हा आपला केंद्रबिंदू आहे, याचे भान सुटता कामा नये, असे आवटे यांनी सांगितले.

बीडच्या सामाजिक आणि वैचारिक परंपरेचा उल्लेख करत त्यांनी तरुणांनी सकारात्मक विचार, सामाजिक बांधिलकी आणि जबाबदार नागरिकत्वाची भूमिका स्वीकारावी, असे आवाहन केले. तुकाराम मुंडे यांच्या कार्यावरील हा ग्रंथ तरुणांना प्रामाणिकपणे काम करण्याची

### तरुणांनी जीवनप्रवासातून प्रेरणा घ्यावी : ज्येष्ठ पत्रकार व लेखक शफी पठाण

बीडच्या मातीतील या भूमिपुत्राचे विचार, संघर्ष आणि आदर्श प्रत्येक विद्यार्थ्यापर्यंत तसेच वाचनालयापर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. तरुणांनी त्यांच्या जीवनप्रवासातून प्रेरणा घेऊन सकारात्मक दिशेने वाटचाल करावी, असे आवाहन ज्येष्ठ पत्रकार व लेखक शफी पठाण यांनी केले.पुस्तकाच्या यशाचे ९९ टक्के श्रेय तुकाराम मुंडे यांच्या संघर्षमय आणि प्रामाणिक कर्तृत्वाला आहे, तर लेखकाचे योगदान केवळ १ टक्का असल्याचे त्यांनी सांगितले. तुकाराम मुंडे यांच्या कार्यामुळेच पुस्तकाला वाचकांचा प्रतिसाद मिळत असल्याचे त्यांनी नमूद केले. ताडसोन्ना या छोट्या गावातून अत्यंत प्रतिकूल आणि गरिबीच्या परिस्थितीत शिक्षण घेत मुंडे बंधूंनी यशाचा प्रवास घडवून आणला. हा संघर्षमय प्रवास अडचणींचा सामना करणाऱ्या आणि निराश झालेल्या तरुण-तरुणींना नवी उमेद देणारा आहे. परिस्थिती कितीही कठीण असली तरी ध्येय निश्चित ठेवून प्रयत्न केल्यास यश मिळवता येते, असा संदेश त्यांच्या जीवनप्रवासातून मिळतो, असे पठाण यांनी सांगितले. अन्न व औषध प्रशासन तसेच महापालिका यांसारख्या विविध प्रशासकीय जबाबदाऱ्या सांभाळताना तुकाराम मुंडे यांनी लोककल्याणाला प्राधान्य दिले. भेसळ आणि भ्रष्टाचाराविरोधात त्यांनी घेतलेल्या ठाम भूमिकेचाही यावेळी उल्लेख करण्यात आला.



बीड : श्री. संत शिरोमणी सावता महाराज यांच्या संजीवनी समाधी सोहळ्यानिमित्त मनोभावे दर्शन घेऊन अभिवादन करताना महात्मा फुले समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस तथा सिनेट सदस्य अँड सुभाष राऊत, जिल्हाध्यक्ष निखिल शिंदे, महादेव दुधाळ आदि उपस्थित होते.

# बीड शहरातील वाढती वाहतूक कोंडी टाळण्यासाठी आ.संदीप क्षीरसागरांनी केली रिंग रोडची मागणी

बीड । प्रतिनिधी

बीड शहरात वाढणारी वाहतूक कोंडी टाळण्यासाठी आणि भविष्यातील विकासाचा विस्तार लक्षात घेता, शहराच्या पश्चिम भागाला जोडणाऱ्या नवीन बाह्यवळण (रिंग रोड) बायपास रस्त्याची मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे केली आहे. मंगळवारी (दि.११) रोजी आ.संदीप क्षीरसागर यांनी या संदर्भात केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री



केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरींची भेट; डीपीआर तयार करण्याचे दिले निर्देश

नितीन गडकरी यांची भेट घेऊन त्यांना सविस्तर निवेदन दिले. या मागणीची तातडीने दखल घेत केंद्रीय मंत्री गडकरी यांनी संबंधित यंत्रणेला या प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करण्याचे निर्देश दिले आहेत.आ.क्षीरसागर यांनी मागणी केलेला रिंग रोड बाह्यवळण रस्ता शहराच्या पश्चिम भागाला जोडणारा असून, तो नामलगाव फाटा (NH-52) ते म्हसोबा फाटा (NH 361F) ते पाली (NH-52) असा असणार आहे.

सध्या बीड शहरात अवजड आणि बाहेरील वाहनांमुळे मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी निर्माण होत आहे. यामुळे नागरिकांना दैनंदिन प्रवासात नाहक त्रास सहन करावा लागत असून अपघातांचा धोकाही वाढला आहे. हा बायपास रस्ता पूर्ण झाल्यास शहरातील मुख्य रस्त्यांवरील वाहतुकीचा ताण लक्षणीयरीत्या कमी होईल. तसेच बीडच्या आर्थिक विकासाला गती मिळणार आहे. ◀◀ पान ३ वर

# डॉक्टर हे देशाच्या आरोग्य व्यवस्थेत मोठा बदल घडवू शकतात - डॉ.ओमप्रकाश शेटे

**गुणवंत विद्यार्थ्यांचा देवदूत प्रतिष्ठानच्या वतीने सत्कार**

दिंद्रुड । प्रतिनिधी

वैद्यकीय क्षेत्रात करिअर करण्याचे स्वप्न पाहणाऱ्या आणि नीट परीक्षेत विशेष प्राविण्य मिळवलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा देवदूत प्रतिष्ठान च्या वतीने जाहीर सत्कार करण्यात आला. आयुष्मान भारत मिशन महाराष्ट्र समितीचे अध्यक्ष डॉ.ओमप्रकाश शेटे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि प्रमुख उपस्थितीत हा गुणगौरव सोहळा संपन्न झाला. यावेळी बोलताना डॉ. शेटे यांनी आयुष्मान



भारत सारख्या योजनांमधून डॉक्टर देशाच्या आरोग्य व्यवस्थेत मोठा बदल घडवू शकत असल्याचे प्रतिपादन केले.

कार्यक्रमास युवा नेते दादासाहेब मुंडे, सचिन उबाळे, प्रा. डॉ.रमेश गटकळ, नगरसेवक बालाजी चव्हाण, शिवभक्त बाळू ताकट, दैनिक लोकनेता चे संपादक बालाजी तोंडे, युवा नेते अमरसिंह मस्के, शहाजी सोळंके, अशोक करे, सतिष जोशी, दत्ता महाजन, विलास पारेकर, उद्योजक अतुल तोडकरी, संजय धपाटे, संजय पवार, बालासाहेब फपाळ, विकास थेटे, आदी मान्यवर उपस्थित होते. राष्ट्रीय पात्रता सह प्रवेश परीक्षा अर्थात नीटमध्ये उल्लेखनीय यश मिळवून वैद्यकीय, आयुर्वेदीक, दंतवैद्यकीय तसेच इतर आरोग्य विषयक पदवी अभ्यासक्रमांसाठी पात्र होणाऱ्या विद्यार्थ्यांचा यावेळी शाल, श्रीफळ आणि भेटवस्तू देऊन सन्मान करण्यात आला.

या सत्कार सोहळ्याला विद्यार्थ्यांचे ◀◀ पान ३ वर

# डायल ११२ वर खोटी माहिती देणे पडले महागात; शिवाजीनगर पोलिसांत गुन्हा दाखल

बीड । प्रतिनिधी

डायल ११२ या आपत्कालीन सेवेचा गैरवापर करणे एका इसमाला चांगलेच महागात पडले आहे. पोलीस नियंत्रण कक्षाला बहीण आणि नातूचा खून झाल्याची खोटी माहिती देणाऱ्या व्यक्तीवर शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आज सकाळी ७:५० वाजताच्या सुमारास एका इसमाने डायल ११२ वर फोन करून शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत राहणाऱ्या



आपल्या बहिणीचा आणि नातवाचा खून झाल्याची खोटी माहिती दिली. या गंभीर माहितीमुळे पोलीस यंत्रणा तातडीने कामाला लागली आणि पोलीस अधिकारी व कर्मचारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले.

तपासणीदरम्यान असे निदर्शनास आले की, संबंधित व्यक्तीची बहीण सुरक्षित आहे आणि अशी कोणतीही दुर्दैवी घटना घडलेली नाही. तसेच, सदर व्यक्तीने यापूर्वी पहाटे ५:१५ वाजताच्या सुमारास देखील आपल्या घरावर कोणीतरी दगडफेक केल्याची खोटी तक्रार केली होती. पोलिसांना विनाकारण त्रास देण्याच्या उद्देशानेच वारंवार खोटी माहिती दिल्याचे स्पष्ट झाले आहे.

या प्रकरणी महावीर रतनलाल कर्नावट (वय ५०, रा. पांडुरंग रेसिडेन्सी, बीड) याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला असून सहाय्यक ◀◀ पान ३ वर

# माजलगाव मध्ये गुरुवारी माजी खासदार डॉ.प्रितम मुंडेंच्या उपस्थितीत तिरंगा रॅली

माजलगाव । प्रतिनिधी

येथील भारतीय जनता पार्टीच्या वतीने दि १३ ऑगस्ट गुरुवार रोजी सकाळी १०:०० वाजता माजी खासदार डॉ प्रितम मुंडे यांच्या उपस्थितीत भव्य मोटरसायकल तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले असून भाजपाच्या कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन माजलगाव शहर मंडळ अध्याक्ष विनायक रत्नपारखी यांनी केले आहे



भाजपाच्या वतीने दि १३ ऑगस्ट गुरुवार रोजी भव्य मोटरसायकल तिरंगा रॅलीचे आयोजन माजी खासदार डॉ प्रितम मुंडे यांच्या उपस्थितीत करण्यात आले असुन भव्य मोटरसायकल तिरंगा रॅली झेंडा चौकात सकाळी १०:०० वाजता सुरू होणार असून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण व आभिवादन करून रॅलीस सुरुवात होणार आहे.हि मोटरसायकल तिरंगा रॅली शहरातील हनुमान चौक,डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक ते छत्रपती संभाजी महाराज चौक येथे या रॅलीची सांगता होणार आहे. छत्रपती संभाजी महाराज चौक ठिकाणी माजी खासदार डॉ प्रीतम मुंडे या तिरंगा रॅलीतील कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करणार आहेत.तरी भव्य मोटरसायकल तिरंगा रॅलीसाठी भाजपाच्या सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यानी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन शहर मंडळ अध्यक्ष विनायक रत्नपारखी यांनी केले आहे..

## हर घर तिरंगा अभियान : राष्ट्रध्वज फडकविताना ध्वज संहितेचे पालन करणे बंधनकारक

बीड । प्रतिनिधी

भारत सरकारच्या वतीने देशभरात हर घर तिरंगा २०२६ अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत सर्व नागरिक, खाजगी संस्था, शैक्षणिक संस्था आणि विविध आस्थापनांना आपल्या घरावर व कार्यालयावर राष्ट्रध्वज फडकविण्याचे आवाहन करण्यात आले आहे. तसेच राष्ट्रध्वज फडकविताना भारतीय ध्वज संहितेतील तरतुदींचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक असून राष्ट्रध्वजाचा सन्मान व पावित्र्य राखण्याची विशेष दक्षता घेण्याचे निर्देशही केंद्र शासनाने दिले आहेत.

या अभियानाच्या पार्श्वभूमीवर ९ ऑगस्ट ते १७ ऑगस्ट २०२६ या कालावधीत राबविले जात आहे. या ९दिवसांच्या कालावधीत नागरिक कोणत्याही दिवशी राष्ट्रध्वज फडकवू शकतात. केंद्र सरकारच्या जुलै २०२२ मधील सुधारित नियमांनुसार, खुल्या जागेत किंवा नागरिकांच्या घरावर फडकविण्यात आलेला राष्ट्रध्वज आता दिवस आणि रात्र अशा दोन्ही वेळेस फडकविता येऊ शकेल. तसेच राष्ट्रध्वज फडकविण्यासाठी

# उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाचे आवाहन

### धर्मवीर आनंद दिघे साहेब प्रवासी वाहतूक चालक कल्याणकारी मंडळाच्या सदस्यत्वासाठी नोंदणी करावी

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाच्या महत्त्वपूर्ण निर्णयानंतर आता बीड जिल्ह्यातील सर्व प्रकारच्या प्रवासी वाहन चालकांसाठी धर्मवीर आनंद दिघे साहेब महाराष्ट्र प्रवासी वाहतुक कल्याणकारी मंडळाचे सदस्यत्व खुले करण्यात आले आहे. तरी बीड जिल्ह्यातील पात्र चालकांनी मोठ्या संख्येने नोंदणी करून शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन बीडचे उप प्रादेशिक परिवहन अधिकारी सुरेश आव्हाड यांनी केले आहे.

२० मे २०२६ रोजीच्या शासन निर्णयानुसार धर्मवीर आनंद दिघे साहेब महाराष्ट्र ऑटोरिक्षा व मीटर टॅक्सी चालक कल्याणकारी मंडळाचे कार्यक्षेत्र विस्तारण्यात आलेले आहे. त्यामुळे आता ऑटोरिक्षा व मिटर टॅक्सी चालकांसह टॅक्सी, कॅब, ॲप-आधारित ओला-उबर सेवा, पर्यटन वाहने तसेच इतर सर्व प्रवासी वाहने चालविणारे चालकही मंडळाचे सदस्य होऊ शकणार आहेत. सदस्यत्व घेतल्यानंतर पात्र चालकांना शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ मिळणार असून, या निर्णयामुळे राज्यातील हजारो ॲप-आधारित कॅब चालकांनाही मोठा दिलासा मिळाला आहे. त्यामुळे प्रवासी वाहन चालकांनी विलंब न करता कल्याणकारी मंडळाचे सदस्यत्वासाठी https://ananddighekalyankarimandal.org या अधिकृत संकेतस्थळावर अर्ज करावा किंवा कार्यालयात सदस्यत्व नोंदणी साठी अर्ज करावा. प्रवासी चालकांच्या सामाजिक आणि आर्थिक सुरक्षेसाठी हे सदस्यत्व महत्वाचे आहे. सर्व पात्र चालकांनी नोंदणी करुन शासनाच्या कल्याणकारी योजनांचा लाभ घ्यावा, असेही प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

# रोहयो मंत्री भरतशेठ गोगावले यांच्या उपस्थितीत गुरुवारी शिवसेनेची बैठक

## शिवसैनिकांनी उपस्थित राहावे : जगताप, मुळूक, गलधर, नवले

बीड । प्रतिनिधी

रोजगार हमी योजना मंत्री तथा बीड जिल्हा शिवसेना संपर्कमंत्री भरतशेठ गोगावले संपर्कप्रमुख मनोज जी शिंदे साहेब मराठवाडा सचिव अशोक पटवर्धन साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीत गुरुवारी (दि. १३) बीड येथे शिवसेनेची आढावा बैठक होणार आहे. त्यांच्या उपस्थितीत विविध कार्यक्रम होणार



असून शिवसेनेच्या बैठकीस शिवसैनिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल जगताप, सचिन मुळूक, स्वप्नील गलधर, चंद्रकांत नवले यांनी केले आहे.

जिल्हा संपर्कमंत्री भरतशेठ गोगावले व संपर्कप्रमुख मनोज शिंदे साहेब, मराठवाडा सचिव अशोक पटवर्धन साहेब गुरुवारी दुपारी २ वाजता गेवराई येथील साई सिद्धी मंगल कार्यालयात आयोजित गेवराई विधानसभा मेळावा व पक्ष प्रवेश कार्यक्रमास उपस्थित राहणार आहेत. यानंतर दुपारी ३ वाजता त्यांचे बीड शहरात आगमन होणार असून जिल्हाधिकारी कार्यालयात आढावा बैठक होणार आहे. दुपारी ४ वाजता हॉटेल ग्रँड यशोदा येथे शिवसेनेची आढावा बैठक आयोजित करण्यात आली आहे. सायंकाळी ५ वाजता मंत्री गोगावले इमामपूर येथे जाणार आहेत. तेथे पाणंद ◀◀ पान ३ वर

# वारकरी संप्रदायाची आचारसंहिताच सावता महाराजांनी घालून दिली -महादेव महाराज जवळेकर

बीड । प्रतिनिधी

वारकरी संप्रदायाची आचारसंहिता सावता महाराजांनी घालून दिली ही आचारसंहिता आजही कायम चालू आहे.आणी पुढेही आचारसंहिता चालूच राहणार आहे. सावता महाराजांनी 'कांदा मुळा भाजी अवघी विठाई माझी' असे म्हणत आपले कर्मच ईश्वराची भक्ती आहे हे दाखवून दिले. त्यामुळे आज स्वतः विठ्ठल सावता महाराजांच्या भेटीला येतात हे सावता महाराजांचे श्रेष्ठत्व आहे. असे विवेचन ह भ प महादेव महाराज जवळेकर यांनी बीड शहरातील बिंदुसरा काठावर



असलेल्या सावता महाराज मंदिरात कीर्तनात बोलताना केले यावेळी बीड शहर आणि परिसरातील अनेक भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी कीर्तन रुपी सेवा देताना ह भ प महादेव महाराज जवळेकर यांनी सावता महाराजांची संपूर्ण जीवनशैली सांगितली. सावता महाराजांनी सर्व संतांना एकत्र करून वैष्णव पंथाची आचारसंहिता तयार केली. ही आचारसहिता आजही लागू पडते. ज्या संतांनी विठ्ठलाला आपल्या कीर्तन रुपी सेवेमध्ये नाचण्यासाठी भाग पाडले ते संत इतर सर्व संतापेक्षा श्रेष्ठ आहेत. कीर्तनात रंगून जायला भक्ती तेवढी श्रेष्ठ असावी लागते. महाराष्ट्रातील संत ज्ञानेश्वर, तुकाराम महाराज, संत चोखोबा, संत नामदेव महाराज संत जनाबाई अशा अनेक संतांनी जी आचारसंहिता घालून दिलेली आहे. त्यामुळे आज महाराष्ट्र सुसंस्कृत आणि इतरांपेक्षा श्रेष्ठ आहे. सावता महाराज पंढरपूरला गेले नाही हे म्हणणे म्हणजे डॉक्टरांनी रुग्णाला न तपासता आणि ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26